25 June 2026 page 01_Layout 1 6/24/2026 8:06 PM Page 1

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

गुरूवार २५ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १७५ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Tuesday, 25 June 2026 | Year : 6 | Issue : 175 | Daily | Rate: Rs. 5/-

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

JUSTICE FOR ALL
ADVO CATE

संपर्क
अॅड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

**दि. २5 जून 2026**



१९२३- डॉ. आंबेडकरांनी वकीली ची सनद मिळावी म्हणून मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली.

१९४५- सिमला परिषद डॉ. बाबासाहेबांच्या उपस्थितीत सुरू.

१९४६- बॉम्बे सेंट्रल स्थानकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य सत्कार.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

# विधान परिषदेत सत्ताधारींमध्ये कर्जमाफीच्या मुद्द्यावरून वाद



**मुंबई :** विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सध्या मुंबईतील विधान भवन येथे सुरू आहे. या अधिवेशनात आज विधान परिषद सभागृहात दोन सत्ताधारी आमदारांमध्ये जुंपल्याचे चित्र पाहायला मिळाले. शिंदेसेनेचे आमदार बच्चू कडू आणि भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांच्यात हा वाद झाला. कर्जमाफीच्या मुद्द्यावर मंत्री बोलत असताना कडू यांनी त्यांना प्रश्न केला. त्यावरून प्रवीण दरेकरांनी आक्षेप घेतला. या वादात शेवटी विधान परिषदेच्या सभापतींना मध्यस्थी करावी लागली. विधान परिषदेच्या सभागृहात कर्जमाफीच्या मुद्द्यावरून शिंदेसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी मंत्री बाबासाहेब पाटील यांना प्रश्न केला. तुमच्याकडून उत्तरे आली पाहिजेत, परंतु तुम्ही देत नाही असं दिसून येते असं कडू म्हणाले. त्यावर प्रवीण दरेकरांनी आक्षेप घेतला. आज प्रश्नोत्तरावेळी असेच झाले आणि आता राज्याचे मंत्री सरकारकडून उत्तर देत असताना मध्येच असे थांबवले. त्यामुळे काही प्रथा परंपरा बिघडायला लागल्यात. वारंवार हे सुरू आहे. त्यामुळे यापुढे हे होणार नाही याची दक्षता सभापतींनी घ्यावी अशी मागणी दरेकरांनी केली.

त्याशिवाय बच्चू कडू हे शेतकऱ्यांसाठी आंदोलन करतात. त्यांचे नेतृत्व करतात मग तुम्हाला उत्तरे पाहिजे की केवळ दिखावा करायचाय. सरकारच्या मंत्र्यांचे भाषण सुरू असताना अशाप्रकारे अडथळा आणणे हे बरोबर आहे का? असे संतापून दरेकरांनी विचारले. तेव्हा बच्चू कडू यांनीही मी इथं नवीन आलो नाही असं ओरडून म्हटले तेव्हा दरेकांनी तुम्ही ओरडू नका, तुमच्या दहा पटीने जास्त ओरडतो. तुमच्या स्टाईलने सभागृहाचे कामकाज चालणार नाही. सभागृहाचं कामकाज दादागिरीवर चालणार नाही. ज्यांना हुल द्यायची त्यांना द्या असेंआक्रमक विधान प्रवीण दरेकरांनी सभागृहात केले. दरम्यान, सभागृहातील वातावरण तापलेले पाहून सभापतींनी या वादावर मध्यस्थी केली. सभागृहाची शिस्त आणि नियम सगळ्या सदस्यांनी पाळणे गरजेचे आहे. एकमेकांना आपसांत प्रश्न प्रतिप्रश्न करणे, मंत्री उत्तर देतांना अर्ध्यावरच बोलणे त्यातून काय साध्य होणार आहे? अनेक चर्चेत सदस्य भाग घेतात. ज्येष्ठ मंत्र्यांनी सुरुवात केली आणि लगेच त्यांना प्रतिप्रश्न विचारणे हे बरोबर नाही. सभागृहात काही सदस्य नवीन आहेत त्यामुळे या सभागृहाची जी काही प्रथा परंपरा आहे. कुणीही उठते, कुणी व्हेलमध्ये येतंय तर कुणी क्रॉस करतेय. त्यामुळे मला कुणावर कारवाई करण्याची वेळ येऊ नये म्हणून याची गांभीर्याने दखल घ्यावी असे सभापती राम शिंदे यांनी म्हटले.

### महाराष्ट्र विधानमंडळ पावसाळी अधिवेशन : आज (२४ जून २०२६) च्या कामकाजाचा आढावा

**विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचा प्रश्न**

काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके यांनी सहा वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या वैधानिक विकास मंडळांच्या पुनर्गठनाचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. सरकारने वारंवार आश्वासने देऊनही मंडळे कार्यान्वित न केल्याबद्दल त्यांनी सरकारला धारेवर धरले.

**अमली पदार्थांविरोधात सरकारची मोहीम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात व्यसनमुक्ती केंद्रे स्थापन करण्याची घोषणा केली. अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येणार असून ड्रग्ज नेटवर्कवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**विधान परिषद निवडणुकीवरून आरोप-प्रत्यारोप**

अलीकडील विधान परिषद निवडणुकांमध्ये महायुतीच्या विजयावरून काँग्रेसने सरकारवर सत्ता, पैसा आणि दबाव यंत्रणेचा गैरवापर केल्याचा आरोप केला. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

**पावसाळी अधिवेशनातील प्रमुख राजकीय मुद्दे**

शेतकरी कर्जमाफी, बेरोजगारी, महागाई, पाणीटंचाई, ओबीसी आरक्षण, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि कायदा-सुव्यवस्था या मुद्द्यांवर विरोधकांनी सरकारला घेरण्याची भूमिका कायम ठेवली आहे. अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच या मुद्द्यांवरून वातावरण तापलेले आहे.

**अधिवेशनाचा कालावधी**

२२ जूनपासून सुरू झालेले हे पावसाळी अधिवेशन १० जुलैपर्यंत चालणार आहे. सरकारकडून अनेक विधेयके आणि पूरक मागण्या सभागृहात मांडल्या जाणार आहेत. आजच्या कामकाजात विदर्भ विकास मंडळांचा मुद्दा विशेष गाजला.

# विद्यार्थ्यांच्या आवाजाला दहशतवाद्यांचा प्रतिध्वनी म्हणणे चुकीचे : मल्लिकार्जुन खर्गे

**नवी दिल्ली :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या कथित 'दहशतवादी' वक्तव्यावरून राजकारण तापले आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचे प्रयत्न होत असल्याच्या आरोपावरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी बुधवारी प्रधान यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी सरकार त्यांची बदनामी करत असल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित मुद्द्यांवर देशभरात असंतोष असून, अशा वेळी शिक्षणमंत्र्यांचे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आहे, असे खर्गे म्हणाले.



खर्गे म्हणाले की, गेल्या काही वर्षांत अनेक परीक्षांचे पेपर फुटले असून, त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम झाला आहे. त्यांनी दावा केला की, नीट पेपरफुटी प्रकरणामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या असून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, या समस्यांवर तोडगा काढण्याऐवजी शिक्षणमंत्री आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आवाजाला 'दहशतवाद्यांचा प्रतिध्वनी' म्हणत आहेत. ते म्हणाले की, 'विद्यार्थ्यांचा प्रतिध्वनी' देशभरात अधिक तीव्र होईल आणि धर्मेंद्र प्रधान यांना आपल्या पदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले जाईल. विद्यार्थी संघटना सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्यावरही निशाणा साधला. विद्यार्थ्यांसाठी न्यायाची मागणी करणाऱ्या तरुणांना 'दहशतवाद्यांची बी टीम' म्हणणे अत्यंत अपमानकारक आहे, असा आरोप त्यांनी केला. दीपके म्हणाले की, देशातील तरुण दहशतवादी नाहीत आणि त्यांना देशभक्तीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार कोणालाही नाही. काँग्रेस पक्षाने नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील कथित

> “ मोदी सरकारचे शिक्षणमंत्री आपले पद वाचवण्यात व्यस्त आहेत. सरकारवर प्रश्न विचारणाऱ्या कोणालाही देशद्रोही ठरवले जाते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यापूर्वी शेतकऱ्यांना 'आंदोलक' आणि 'परजीवी' म्हटले होते आणि आता विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचे असेच प्रयत्न केले जात आहेत.
>
> - मल्लिकार्जुन खरगे?

अनियमिततेचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला आहे. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी झाला आहे, असा विरोधी पक्षांचा आरोप आहे. अनेक विद्यार्थी संघटनाही या मुद्द्यावर आंदोलन करत आहेत. परीक्षा पद्धती पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, असे विरोधी पक्षाचे म्हणणे आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या कथित वक्तव्यावरून काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी सरकारला घेरण्यास सुरुवात केली आहे. येत्या काही दिवसांत संसदेत आणि रस्त्यांवर हा मुद्दा अधिक चिघळण्याची शक्यता आहे. शिक्षणमंत्र्यांनी माफी मागावी आणि राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधी पक्ष करत असून, सरकारकडून सविस्तर उत्तराची प्रतीक्षा आहे. भाजपने काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि त्यांचे पुत्र, कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांक खर्गे यांच्यावर जमीन बळकावल्याचा आरोप केला आहे. भाजपचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी दावा केला की, खर्गे कुटुंबाने कर्नाटकातील विविध ठिकाणी जमीन मिळवण्यासाठी आपल्या प्रभावाचा आणि सत्तेचा गैरवापर केला. त्यांनी असा आरोप केला की, हे ‘जमीन बळकावण्याचे’ काम सिद्धार्थ विहार ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात आले.

## महत्वाच्या बातम्या

### २०२५ पर्यंत दीड कोटींहून अधिक पासपोर्ट सेवा पुरवल्या जातील

**नवी दिल्ली :** परराष्ट्र मंत्रालयाने (MEA) म्हटले आहे की, भारतातील पासपोर्ट सेवांची व्याप्ती सातत्याने विस्तारत असून, लोकांना पूर्वीपेक्षा अधिक जलद आणि सोयीस्कर सेवा मिळत आहेत. मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, २०२५ मध्ये देशभरात १५ दशलक्ष पासपोर्ट आणि संबंधित सेवा पुरवण्यात आल्या. यापैकी, केवळ जारी केलेल्या पासपोर्टची संख्या १३.९ दशलक्ष होती. अधिकाऱ्याने सांगितले की, पोलीस पडताळणी प्रक्रिया वगळता पासपोर्ट जारी करण्यासाठी सरासरी सहा कामकाजाचे दिवस लागतात. दरम्यान, पासपोर्ट सेवा केंद्रे (PSKs) आणि पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्रे (POP-SKs) येथील सरासरी प्रतीक्षा वेळ ४५ मिनिटांपेक्षा कमी झाली असून, त्यामुळे अर्जदारांना लक्षणीय दिलासा मिळाला आहे.

### सरकारी नोकरीच्या नावाखाली 2 कोटींचा घोटाळा!

**नागपूर :** सरकारी नोकरीच्या शोधात बेरोजगार युवकांच्या स्वप्नांशी खेळणारे एक मोठे फसवणुकीचे रॅकेट विदर्भात कार्यरत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आरोग्य, आयकर, सार्वजनिक बांधकाम, कृषी आणि शिक्षण विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत नागपुरातील काही भामट्यांनी जवळपास दोन कोटींहून अधिक रुपये उकळले आहेत. आतापर्यंत नऊ तक्रारदारच समोर आले असून, फसवणुकीचा विस्तार आणखी जास्त असून आकडा वाढण्याची शक्यता आहे. आरोग्यसेवक, आरोग्य विभागात कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभागात लिपिक, कृषी विभागात लिपिक तसेच शिक्षण विभागात शिक्षक पदावर नियुक्ती मिळवून देण्याचे आमिष दाखविण्यात आले. प्रत्येक उमेदवाराकडून १२ लाख ते २५ लाख रुपयांपर्यंत रक्कम घेतली. पीडितांनी नोकरीच्या आशेने आयुष्यभराची बचत, कर्ज आणि इतर मार्गांनी पैसे जमवून आरोपींकडे दिले. सुरुवातीला आरोपींनी नियुक्ती प्रक्रिया सुरू असल्याचे सांगत विश्वास संपादन केला. काहींना बनावट नियुक्तिपत्रे दाखविण्यात आली तर काहींना लवकरच रुजू करून घेतले जाईल, असे आश्वासन देण्यात आले. या प्रकरणात फसवणूक झालेल्यांनी पोलिसांत तक्रार केली आहे. मात्र, अद्यापपर्यंत गुन्हा दाखल झालेला नाही.

### फायरब्रँड IPS अधिकारी विश्वास नांगरे पाटील नागपुरचे 'सीपी'

**नागपूर :** नागपुरचे पोलीस आयुक्त डॉ.रविंद्रकुमार सिंगल यांची बदली करण्यात आली असून आता ‘फायरब्रँड’ अधिकारी अशी ओळख असलेले विश्वास नांगरे पाटील हे नागपुरचे नवे पोलीस आयुक्त असतील. गृहविभागाकडून मंगळवारी सायंकाळी यासंदर्भात आदेश जारी करण्यात आला. अपर पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांच्याकडे नागपुरची जबाबदारी देण्यात आली आहे. मागील काही कालावधीपासून नागपुरात गुन्हेगारी वाढली होती. एकट्या मे महिन्यात तर १४ हत्यांनी शहर हादरले होते. यासोबतच एकीकडे पोलिसांकडून ‘ऑपरेशन थंडर’च्या माध्यमातून अंमली पदार्थांविरोधात मोहीम सुरू करण्यात आली असतानादेखील एमडी, गांजा यांची तस्करी सुरूच असल्याचे चित्र आहे. अगदी पोलीस कर्मचाऱ्यांवरदेखील हल्ल्यांचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले. या सर्व बाबींमुळे एकूणच कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत होते. डॉ.सिंगल यांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये नागपूर पोलीस आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारली होती. विधानसभा व लोकसभा निवडणूकीदरम्यान शहरात शांतता ठेवण्यात त्यांना यश आले होते. मात्र १७ मार्च २०२५ रोजी महाल येथील उसळलेल्या दंगलीमुळे गुप्तचर यंत्रणेबाबत अनेक सवाल निर्माण झाले होते. दोन वर्ष चार महिन्यांचा त्यांचा कार्यकाळ राहिला.

### भारतात सुरू झाली पहिली खाजगी सोन्याची खाण

**नवी दिल्ली :** भारतीय खाण क्षेत्रात बुधवारचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. आंध्र प्रदेशातील कुर्नूल जिल्ह्यातील तुग्गली मंडालात असलेल्या 'स्वर्णगिरी' येथे देशातील पहिल्या खाजगी सोन्याच्या खाणीतून व्यावसायिक उत्पादन अधिकृतपणे सुरू झाले आहे. राज्याचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या खाणीचे उद्घाटन केले असून, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात सुरू झालेली ही एकमेव खाजगी प्राथमिक सोन्याची खाण आहे. या प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेऊन आंध्र प्रदेश कॅबिनेटने उद्घाटनापूर्वीच या भागातील 'जोन्नागिरी' गावाचे नाव बदलून अधिकृतपणे 'स्वर्णगिरी' ठेवण्यास मंजुरी दिली. हा प्रकल्प 'जिओमायसोरे सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'द्वारे चालवला जात आहे. सुमारे ४०५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उभारलेला हा सोन्याचा खाण प्रकल्प तब्बल ५९८ हेक्टर परिसरात पसरलेला आहे. या महत्त्वाकांक्षी स्वर्णगिरी गोल्ड प्रोजेक्टमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ७०० लोकांना थेट रोजगार मिळेल, ज्यापैकी ८०% कर्मचारी स्थानिक समुदायातून असतील. सोन्याच्या उत्पादनातून राज्य सरकारला दरवर्षी कोट्यवधी रुपयांची रॉयल्टी आणि कर मिळणार आहे.

# आरएसएसला उत्तर देण्याचे उत्तरदायित्व का नाही? प्रियांक खरगे



**नवी दिल्ली :** कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खरगे यांनी नुकताच रा.स्व. संघाला एक प्रश्न विचारला. पण त्याचे उत्तर देण्याऐवजी संघ परिवारातील नेत्यांनी या प्रश्नावरच आक्षेप घेतला. वास्तविक खरगे यांनी उपस्थित केलेला मुद्दा केवळ राजकीय नसून पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायद्यापुढील समानतेशी संबंधित आहे.

कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खरगे यांनी १५ जून २०२६ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षांपासून अनुत्तरित राहिलेला एक प्रश्न विचारला. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना पत्र लिहून त्यांनी संघ नेमका कोणत्या कायदेशीर चौकटीत कार्य करतो, याबाबत स्पष्टता मागितली. खरगे यांनी हा प्रश्न केवळ राजकीय आरोपांच्या पातळीवर उपस्थित केलेला नाही. संघाच्या २०२५-२६ च्या वार्षिक अहवालानुसार, कर्नाटकात ४,१२७ दैनंदिन शाखा, १,३८९ साप्ताहिक मीलन, दोन हजारांहून अधिक समाजोत्सव आणि दोन लाखांपेक्षा अधिक स्वयंसेवकांचे ५६२ पथसंचलन आयोजित करण्यात आले. एवढ्या व्यापक प्रमाणावर कार्यरत असलेल्या संघटनेचे कायदेशीर स्वरूप नेमके काय आहे, हा त्यांचा प्रश्न होता.

# फ्लाय अॅशच्या विळख्यात उत्तर नागपूर

### डॉ. नितीन राऊत यांचा नियम २६६ अंतर्गत विनंती अर्ज

**नागपूर :** कोराडी औष्णिक वीज केंद्र आणि वेकोलिच्या खाणींमधून निर्माण होणाऱ्या फ्लाय अॅशमुळे उत्तर नागपूरातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत राज्याचे माजी मंत्री तथा काँग्रेसचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २६६ अन्वये विनंती अर्ज सादर केला आहे. प्रदूषणग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा मिळावा, तसेच या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.



डॉ. राऊत यांनी सांगितले की, बेझनबाग, नारा, नारी, इंदोरा, मानकापूर, गोधनी आणि उप्पलवाडीसह अनेक दाट लोकवस्तीच्या भागात उडती राख पसरत असून नागरिकांना विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वीज प्रकल्पांमुळे परिसरातील भूजल आणि पिण्याचे पाणीही दूषित होत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा प्रश्न मांडूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नसल्याची टीका करत, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या सर्व्हिलन्स समितीची दीड वर्षांपासून बैठक झालेली नसल्याकडेही डॉ. राऊत यांनी लक्ष वेधले. प्रदूषणग्रस्त भागात नियमित आरोग्य शिबिरे आयोजित केली जात नसल्याचा आरोपही त्यांनी केला. फ्लाय अॅश प्रदूषणामुळे उत्तर नागपूर परिसरात श्वसनविकार, दमा आणि इतर फुफ्फुसांच्या आजारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याची बाब डॉ. नितीन राऊत यांनी विनंती अर्जाद्वारे निदर्शनास आणून दिली आहे. वाढत्या आरोग्य धोक्याचा विचार करून बाधित भागात विशेष आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत तसेच श्वसन व दम्याच्या आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. उत्तर नागपुरातील फ्लाय अॅश प्रदूषणासंदर्भात डॉ.राऊत यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २६६ अन्वये विनंती अर्ज सादर केला आहे. हा अर्ज विधानसभा अध्यक्षांनी विधानसभा विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द केला असून, आता या अर्जावर समितीच्या सचिवांकडून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. संबंधित विभागांकडून अहवाल मागवून समिती या प्रकरणाची सुनावणी घेऊ शकते. त्यानंतर समितीच्या शिफारशींनुसार शासनाला आवश्यक उपाययोजना करण्याबाबत निर्देश दिले जाण्याची शक्यता आहे.

# 'नेहरू देशाचे सर्वोत्तम प्रधानमंत्री : जयराम रमेश



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी देशाच्या प्रधानमंत्रींविषयी आपले मत व्यक्त केले आहे. एका मुलाखतीत त्यांनी जवाहरलाल नेहरूंची खूप प्रशंसा केली. त्यांनी नेहरूंना भारताला आतापर्यंत लाभलेले सर्वोत्तम प्रधानमंत्री म्हटले. दरम्यान, त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्याबद्दल एक वेगळीच टिप्पणी केली. जयराम रमेश म्हणाले की, पटेल हे भारताला लाभू न शकलेले सर्वोत्तम प्रधानमंत्री होते. प्रधानमंत्री मोदी आणि अमित शाह यांच्यावर निशाणा साधतांना जयराम रमेश यांनी भाजप आणि आरएसएसच्या नेत्यांवरही निशाणा साधला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याबद्दल विचारले असता, ते म्हणाले की, ते केवळ बढाई मारणारे आणि मोठ्या गप्पा मारणारे नेते आहेत. आपल्या राजकीय कारकिर्दीबद्दल बोलताना जयराम रमेश यांनी माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांची आठवण काढली . ते म्हणाले की, आज ते राजीव गांधींमुळेच राजकारणात आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, त्यांनी सॅम पित्रोदा यांच्यामार्फत राजीव गांधींच्या सरकारमध्ये काम केले. त्यावेळी ते उद्योग मंत्रालय आणि नियोजन आयोगामध्ये सक्रिय होते. राजकारणात येऊन पक्षासाठी काम करण्याची प्रेरणा त्यांना राजीव गांधींकडूनच मिळाली.






## बहुजन सौरभ संपादकीय

# कृत्रिम बुद्धिमत्ता की बौद्धिक गुलामी?

शिक्षण हे केवळ माहिती मिळविण्याचे साधन नसून विचार करण्याची, विश्लेषण करण्याची आणि स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता विकसित करण्याची प्रक्रिया आहे. शालेय जीवनात लेखन, वाचन आणि पाठांतर या तीन गोष्टी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा पाया मानल्या जातात. मात्र अलीकडच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वाढता वापर आणि त्याला शासनाकडून मिळणारे प्रोत्साहन पाहता एक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याऐवजी त्यांना परावलंबी आणि बौद्धिकदृष्ट्या पंगू बनविण्याचा हा प्रयत्न तर नाही ना? आज एआयच्या माध्यमातून गृहपाठ तयार होतो, निबंध लिहिले जातात, प्रकल्प पूर्ण होतात, उत्तरे शोधली जातात. विद्यार्थ्याला स्वतः विचार करण्याची, माहिती शोधण्याची किंवा लेखन कौशल्य विकसित करण्याची गरज उरत नाही. एका बटणावर सर्व काही उपलब्ध होत असेल तर त्याच्या मेंदूला मेहनत घेण्याची आवश्यकता काय? हा प्रश्न केवळ तांत्रिक नसून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत गंभीर आहे. मानवी मेंदूची क्षमता सततच्या सरावातून विकसित होते. लेखनामुळे विचारांना दिशा मिळते, वाचनामुळे ज्ञानाचा विस्तार होतो आणि पाठांतरामुळे स्मरणशक्ती मजबूत होते. याच प्रक्रियेतून व्यक्तिमत्त्वाची जडणघडण घडते. पण जर प्रत्येक गोष्ट एआयकडून करून घेतली गेली तर विद्यार्थी ज्ञानाचा निर्माता न राहता केवळ ग्राहक बनेल. तो माहितीचा वापर करेल, पण तिचे विश्लेषण करण्याची क्षमता गमावेल. आज शासनाचे अनेक निर्णय 'डिजिटल शिक्षण' आणि 'स्मार्ट शिक्षण' या नावाखाली राबविले जात आहेत. तंत्रज्ञानाचा वापर नाकारण्याचे कारण नाही. परंतु तंत्रज्ञान हे साधन असले पाहिजे, पर्याय नव्हे. दुर्दैवाने सध्याच्या धोरणांमध्ये तंत्रज्ञानाला शिक्षक, पुस्तके आणि स्व-अभ्यास यांच्यापेक्षा अधिक महत्त्व दिले जात आहे. परिणामी विद्यार्थी स्वावलंबी न राहता यंत्रांवर अवलंबून होत आहे. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिक्षणविषयक भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. डॉ. बाबासाहेबांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र दिला. त्यांनी कधीही 'माहिती मिळवा' एवढ्यावर भर दिला नाही. त्यांचा आग्रह होता तो चिकित्सक बुद्धी विकसित करण्यावर. त्यांनी स्वतः हजारो पुस्तके वाचली, ग्रंथालयात दिवस-रात्र अभ्यास केला. त्यांनी कोणत्याही शॉर्टकटचा पुरस्कार केला नाही. डॉ. बाबासाहेबांनी 1943 मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करताना स्पष्ट सांगितले होते की, शिक्षणाचा उद्देश स्वतंत्र विचार करणारा नागरिक घडविणे हा आहे. त्यांच्या मते शिक्षण हे व्यक्तीला प्रश्न विचारण्याची क्षमता देते. जर एखादी व्यवस्था विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीवर मर्यादा आणत असेल, तर ती शिक्षणव्यवस्था नसून गुलाम तयार करणारी यंत्रणा ठरते. बुद्धांच्या शिकवणीतही 'अत्त दीपो भव' म्हणजे 'स्वतःचा दीप स्वतः बना' हा संदेश आहे. डॉ. बाबासाहेबांनीही याच तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला. एआयवर पूर्णपणे अवलंबून राहणारा विद्यार्थी स्वतःचा दीप बनू शकत नाही. तो यंत्राच्या प्रकाशावर जगणारा व्यक्ती बनतो. हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. शासन जर खरोखर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवू इच्छित असेल तर त्याने लेखन, वाचन आणि स्मरणशक्ती वाढविणाऱ्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे. शाळांमध्ये वाचनालये समृद्ध केली पाहिजेत. निबंधलेखन, वक्तृत्व, हस्तलिखित मासिके, पाठांतर स्पर्धा आणि संशोधन प्रकल्प यांना चालना दिली पाहिजे. एआयचा वापर पूरक साधन म्हणून करावा, मुख्य आधार म्हणून नव्हे. आज जगभरातील अनेक शिक्षणतज्ज्ञ एआयच्या अतिवापराबद्दल चिंता व्यक्त करत आहेत. कारण यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता, स्मरणशक्ती आणि सर्जनशीलता कमी होत असल्याचे अनेक अभ्यासांतून दिसून आले आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेली पिढी माहितीने समृद्ध पण बुद्धीने दरिद्री होण्याचा धोका निर्माण झाला आहे. भारतातील शिक्षणव्यवस्थेची खरी गरज आहे ती विचारवंत, संशोधक, लेखक आणि वैज्ञानिक निर्माण करण्याची. यंत्रांवर अवलंबून राहणारे कर्मचारी तयार करण्याची नाही. त्यामुळे एआयचा वापर विवेकाने आणि मर्यादित स्वरूपात झाला पाहिजे. अन्यथा उद्याची पिढी ज्ञानसंपन्न नव्हे तर बटण दाबणारी पिढी म्हणून ओळखली जाईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज असते तर त्यांनी निश्चितच तंत्रज्ञानाचा स्वीकार केला असता; पण त्याहून अधिक ठामपणे विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र विचारशक्तीचे रक्षण करण्यासाठी आवाज उठविला असता. कारण त्यांना माहीत होते की समाजाची खरी प्रगती यंत्रांमुळे नव्हे, तर जागृत, विचारशील आणि स्वाभिमानी माणसांमुळे होते. आजचा प्रश्न एआयचा नाही, तर मानवी बुद्धिमत्तेच्या अस्तित्वाचा आहे. शिक्षणाचे ध्येय विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचे असावे; पंगू बनविण्याचे नव्हे. अन्यथा 'शिका' हा डॉ. बाबासाहेबांचा संदेश 'शोधा' ऐवजी 'कॉपी करा' इतकाच उरेल आणि ती भारतीय शिक्षणव्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका ठरेल.●●

# धम्मसंगोष्टी : चार सौ पार

**१७ डिसेंबर २०१७ हा दिवस धम्मसंगोष्टीचा ऐतिहासिक दिवस! तथागत गौतम बुद्ध आणि त्यांचा धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या मानवमुक्तीच्या तत्वज्ञानाशी निष्ठा जपणाऱ्या धम्मसंगोष्टीच्या ४०० सभा होणे ही गौरवाची घटना आहे. ९ वर्षापूर्वी काही जेष्ठांनी लावलेले धम्मसंगोष्टीचे रोपटे हळूहळू विस्तारीत गेले. या सभांना जवळपास शंभर सभासदांची उपस्थिती आणि सातत्य हेच सांगत आहे.**

'धम्मसंगोष्टी' म्हणजे बौद्ध संस्कृती, संविधानिक मुल्यांची जाण असणारा संघ! धम्म संगोष्टी म्हणजे मागील ९ वर्षापासून प्रत्येक आठवड्याच्या गुरुवारी आंबेडकरी तत्वज्ञानावर चर्चा करणारा जेष्ठांचा समुह! धम्मसंगोष्टी म्हणजे कोणत्याही पदाधिकाऱ्याची नेमणूक न करता धम्माचरण करणारा संघ! आंबेडकरी तत्वज्ञानाचे पायीक बनून कार्य असणारे संघठन म्हणजे धम्मसंगोष्टी! एकता, बंधुता आणि मैत्रीभावना वृद्धिंगत होण्यास कारणीभूत ठरणारा संघ म्हणजे धम्मसंगोष्टी! दर गुरुवारी साप्ताहिक सभेत भेटीगाठी होणे, बंधुत्व भावनेतून एकमेकांची विचारपूस करणे, एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होणे ही धम्मसंगोष्टीची वैशिष्ट्ये बनली आहेत. विशेष म्हणजे धम्मसंगोष्टीचे अस्तित्व बुद्ध-शाहू-फुले-आंबेडकरांचे विचार व तत्वज्ञान रुजवण्यासाठी निर्माण झाले आहे. धम्मसंगोष्टीत निरंतरता, विविधता, परीवर्तनता दिसून येते. आंबेडकरी आणि प्रासंगिक विषयावर विचार मंथनासाठी प्रत्येक सभेत वेगवेगळ्या वक्त्यांना आमंत्रित केले जाते. डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'एकदा विचार नष्ट झाले किंवा विचार करणे थांबवले तर तो समाज संपून जातो.' म्हणून विचार जिवंत ठेवायचे असेल तर सतत प्रबोधन होणे व ते प्रवाहित होणे आवश्यक आहे, याची जाणीव धम्मसंगोष्टीला आहे. वर्तमान पिढीने पुढच्या पिढीला बुद्ध-धम्म आणि तत्वज्ञान संक्रमित करण्याची जाणीव धम्मसंगोष्टीला आहे. बुद्ध- धम्म डॉ. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान हे कालसुसंगत आहे. अर्थात हे तत्वज्ञान भूतकाळात प्रासंगिक होते, तसेच ते आजही आहे आणि भविष्यात राहणार आहे. हे समतामुलक आणि कल्याणकारी विचार सतत प्रवाहित व वृद्धिंगत होत राहो याची जाणीव धम्मसंगोष्टीला आहे.



वर्तमानात बौद्ध समाजासमोर अनेक संकटे आ वासून उभे आहेत. गटातटाचे राजकारण, खाजगीकरण, अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण, खुल्या वर्गात आरक्षण बंदी, धर्म स्वातंत्र्य विद्येयक २०२६, युवकांची बेरोजगारी यासारख्या घटना संकटाची जाणीव करून देत आहेत. आंबेडकरी समाज हा मुळातच निखाऱ्यांचा समूह आहे. या निखाऱ्यांवर फुंकर घालण्याचा प्रयत्न धम्मसंगोष्टीद्वारे होत आहे. बुद्धिजीवी वर्गावर मार्गदर्शकाची जबाबदारी आहे. या जाणीवेतून बुद्धिजीवी वर्गाला कृतीशील बनविण्याचा सुद्धा अल्पसा प्रयत्न होत असतो. ९ वर्षे मागे वळून पाहिले तर धम्मसंगोष्टी सतत वृद्धिंगत होत गेली आहे. काही प्रसंगी अडथळे आलेत. परंतु निष्ठावान, सक्रीय कार्यकर्त्यांमुळे धम्मसंगोष्टीचा प्रवास सहज सुलभ होत गेला. धम्मसंगोष्टीचे बहुतांश कार्यकर्ते हे त्यांच्या सेवा काळात आपापल्या क्षेत्रात दिग्गज होते. तरी सुद्धा जवळपास शंभर खुर्च्या कापडाने पुसणे, त्या रांगेत लावणे, स्टेज सजवणे, माईक सिस्टीम लावणे, उपस्थितांना चहा - नाश्ता वाटप करणे, रिकामे प्लेट्स-चहाचे कप डस्टबिनमध्ये टाकणे, फोटोग्राफी सांभाळणे याप्रकारची आवश्यक सर्व कामे हेच दिग्गज स्वयंस्फूर्तीने करत असतात. ज्यांना जे शक्य आहे ते त्यांनी करावे असा संगोष्टीचा अलिखित नियम बनला आहे.

धम्मसंगोष्टीमध्ये दान पारमिताला विशेष महत्व आहे. सभासद स्वेच्छेने वार्षिक वर्गणी जमा करून धम्मसंगोष्टीला आर्थिक पाठबळ पुरवतात. सामाजिक चळवळीत महिलांचा सहभाग असणे ही प्रगतीशील समाजाची आणि स्त्री-पुरुष समानतेची ओळख आहे. धम्मसंगोष्टीतील महिलांचे योगदान बौद्ध संस्कृतीला गती देणारे ठरले आहे. धम्मसंगोष्टीच्या जमाखर्चाचा लेखाजोखा महिलाच सांभाळत आहेत. महिला इथेच थांबत नाही. 'नमो बुद्धाय ग्रुप' ची स्थापना करून प्रत्येक पौर्णिमा, दिनविशेष कार्यक्रमाचे नियमित आयोजन करत आहेत. मनोरंजन मानवी जीवनाचे अभिन्न अंग समजले जाते, ही बाब लक्षात घेता धम्मसंगोष्टीतून 'सम्यक म्युझिकल ग्रुप'ची निर्मिती झाली. त्याद्वारे बुद्ध-भीम गीतांचे, हिंदी सिनेमातील गीतांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात येतात. धम्मसंगोष्टीच्या कार्यावर 'स्मरणगाथा संगोष्टी'च्या दोन आवृत्त्या प्रकाशित करून धम्म प्रचार-प्रसाराचे कार्य झाले. धम्मसंगोष्टीने वेळोवेळी धम्म सहली आयोजित केल्या. बौद्ध स्थळांना भेटी देऊन बौद्ध संस्कृती समजून घेण्याचे प्रयत्न झाले. कोरोना काळात देशात लॉक डाऊन होता. या काळात झोपडपट्टीतील गोरगरिबांना धान्य, किराणा साहित्य पुरवण्याच्या कार्यात धम्मसंगोष्टीने मागेपुढे पाहिले नाही. आंबेडकरी जलसाकार सीमाताई पाटील आणि अन्य ओबीसींचे धर्मांतर धम्मसंगोष्टीच्या माध्यमातून पार पडले. सुरेश भट हॉलमध्ये संपन्न आंबेडकरी जलसाचे आयोजक धम्मसंगोष्टी होती. आंबेडकर भवन अंबाझरी आंदोलन, महाबोधी महाविहार आंदोलन, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० विरोधी भूमिका, गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य, उपवर्गीकरण विरोधी आंदोलन ई. प्रसंगात धम्मसंगोष्टीने आपली जबाबदारी समजून कार्य केले आहे. धम्मसंगोष्टीच्या कार्यात 'दैनिक बहुजन सौरभ' चे योगदान, सहकार्य अतुलनीय ठरले आहे. दैनिक ब. सौ. ने प्रत्येक गुरुवारच्या सभेचे कार्यवृत्त घराघरात पोहचविले आहे. दैनिक सौरभला आर्थिक आधार देणारे काही भागधारक धम्मसंगोष्टीने मिळवून दिले. धम्मसंगोष्टी ने 'घर घर बहुजन सौरभ अभियान' जवळपास सहा महिने राबविले आहे. धम्मसंगोष्टीच्या कार्याची नोंद घेऊन धम्मसंगोष्टीचे प्रमुख नरेश धोपटे यांना १३ जून २०२६ रोजी 'संविधान फाउंडेशन नागपूर'ने डॉ. भीमराव रामजी आंबेडकर संविधान सन्मानाने पुरस्कृत केले आहे.



श्रीराम बनसोड,
8208617748

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना धम्म हा पुस्तकी पानापेक्षा माणसाच्या आचरणात हवा होता. त्यासाठी त्यांनी धर्मांतराप्रसंगी आपल्या अनुयायांना २२ प्रतिज्ञा दिल्यात. त्यानुसार समाज बऱ्याच प्रमाणात आचरणशील, विज्ञानवादी बनला. चारशे सभा प्रबोधनातून अनेकांच्या जीवनात काही प्रमाणात तरी वैज्ञानिक परिवर्तन घडून आल्याची उपलब्धी म्हणता येईल. ४००व्या सभेचे आकर्षण म्हणजे जेष्ठ आंबेडकरी विचारवंत, वक्ते प्रा. अशोक गोडघाटे असून सभाध्यक्ष बहुजन सौरभ च्या संपादिका प्रा. संध्या राजूरकर राहणार आहेत. या प्रसंगी धम्मसंगोष्टीचे शिलेदार नरेश धोपटे आणि उषा धोपटे, दादाराव बनसोड, हिरालाल शेंडे, सिद्धार्थ शामकुंवर, श्याम जाधव, उपेंद्र कांबळे यांचा सन्मान करण्यात येणार आहे. निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्यांचा सन्मान म्हणजे धम्मसंगोष्टीचा सन्मान होय. आपण सुद्धा धम्मसंगोष्टीचा भाग बनून साप्ताहिक सभेला उपस्थित राहावे, 'चारशे पार' च्या निमित्ताने सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा, मंगल कामना !! ●●




# स्वच्छ पृथ्वी, स्वस्थ मन
## क्लायमेट ॲन्झायटी व विश्व पर्यावरण

मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून विश्व पर्यावरण दिनाचे वेगळे महत्व आहे. मानसिक आरोग्य जागृतीच्या दृष्टिकोनातून विश्व पर्यावरण दिन हा केवळ झाडे लावण्याचा किंवा कचरा गोळा करण्याचा दिवस नाही, तर आपल्या मानसिक आरोग्याशी खोलवर जोडलेला आहे. मेत्ता फाउंडेशन, मनोदय माइंड केअर क्लिनिक, एम्पाथी फाउंडेशन आणि सनशाईन काउंसिलिंग अँड थेरपी सेंटर यांच्या संयुक्त प्रयत्नातून समाजात महत्वपूर्ण कार्यक्रम करून विचार रुजविले जातात त्यातील काही सुंदर पोस्टमध्ये दाखवल्याप्रमाणे, पृथ्वी ही आपली एकमेव घर आहे. तिची काळजी घेतल्याने आपल्या मनाचीही काळजी घेतली जाते.

**पर्यावरण आणि मानसिक आरोग्य यांचा गाढा संबंध :** आधुनिक मानसशास्त्र आणि पर्यावरणीय मानसशास्त्र यात स्पष्टपणे सिद्ध झाले आहे की, स्वच्छ, हिरवीगार आणि नैसर्गिक वातावरण मानसिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**तणाव आणि चिंता कमी होणे :** जंगल, नदीकिनारा किंवा उद्यानात काही वेळ घालवल्याने कोर्टिसोल (तणावाचे हार्मोन) चे प्रमाण कमी होते. 'फॉरेस्ट बाथिंग' (Shinrin-yoku) या जपानी पद्धतीचा अभ्यास असे सांगतो की, झाडांच्या आसपास राहिल्याने चिंता २०-३०% कमी होते.

**डिप्रेशनवर नियंत्रण :** शहरी भागात हिरवाई कमी झाल्यामुळे डिप्रेशन आणि नैराश्याचे प्रमाण वाढत आहे. उलट, हरित क्षेत्र असलेल्या भागातील लोकांमध्ये मानसिक आरोग्य चांगले असते.

**क्लायमेट ॲन्झायटी :** वाढती मानसिक समस्या, क्लायमेट ॲन्झायटी म्हणजे 'हवामान बदलामुळे होणारी चिंता किंवा भीती'. यात जागतिक तापमानवाढ, प्रदूषण आणि ढासळत्या पर्यावरणाचा आपल्या भविष्यावर काय परिणाम होईल, या विचाराने येणारा तीव्र ताण, निराशा आणि असुरक्षिततेची भावना यांचा समावेश होतो. ही काही मानसिक विकृती नसून, भविष्यातील पर्यावरणीय संकटांबद्दलची एक स्वाभाविक आणि मानवी प्रतिक्रिया मानली जाते.

**मुख्य लक्षणे :** सतत भविष्याची चिंता वाटणे, असहाय्यता किंवा काहीच बदलू न शकल्याची भावना राग येणे किंवा नैराश्य येणे. आजकाल क्लायमेट ॲन्झायटी किंवा इको-ॲन्झायटी ही एक मोठी आणि वाढती मानसिक आरोग्य समस्या बनली आहे. ही चिंता हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोडी, वाढते तापमान, वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती (पूर्णवेळ, पूर, दुष्काळ) आणि भविष्यातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर उद्भवते.

**लक्षणे :** सतत भविष्याबद्दल अस्वस्थता, भीती आणि हताशपणा. झोपेच्या समस्या, चिडचिडेपणा, एकाग्रतेची कमतरता. पॅनिक अटॅक्स, नैराश्य, अपराधीपणाची भावना (मी काहीच करू शकत नाही असे वाटणे). दैनंदिन जीवनावर परिणाम, कामात रस न लागणे, सामाजिक मागासले पण. कोण प्रभावित होत आहे? विशेषतः तरुण आणि मुले-किशोरवयीन मुले यांना याचा जास्त त्रास होतो. एका आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणानुसार, १६ ते २५ वयोगटातील ८४% तरुणांना किमान मध्यम पातळीवर क्लायमेट चिंता जाणवते, तर जवळपास ४५-५०% लोकांच्या दैनंदिन जीवनावर याचा नकारात्मक परिणाम होतो. हे केवळ वैयक्तिक चिंता नसून, एका वास्तविक अस्तित्वात्मक धोक्याची प्रतिक्रिया आहे.

मनःस्वास्थ्याचा प्रवास



प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

**मानसिक आरोग्यावर परिणाम :** क्लायमेट ॲन्झायटी थेट डिप्रेशन, चिंताग्रस्त विकार, PTSD आणि दीर्घकालीन तणावाशी जोडलेली आहे. हे केवळ भावनिक त्रास देत नाही तर शारीरिक आरोग्यावरही परिणाम करते, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे, रक्तदाब वाढणे इत्यादी. विशेषतः ज्यांना थेट आपत्तीचा सामना करावा लागला आहे, त्यांच्यात हे प्रभाव अधिक तीव्र दिसतात. पर्यावरण संरक्षण म्हणजे स्वतःच्या मनाचे संरक्षण. जेव्हा आपण पर्यावरणासाठी काही करतो, तेव्हा आपल्या मनाला खूप मोठा फायदा होतो.

**उद्देश आणि अर्थाची भावना :** कचरा वेगळा करणे, झाडे लावणे, प्लास्टिक कमी करणे यासारख्या छोट्या-छोट्या कृत्यांमुळे 'मी काहीतरी चांगले करतोय' अशी सकारात्मक भावना निर्माण होते. हे सेल्फ-वर्थ आणि आत्मसन्मान वाढवते.

**समुदाय आणि संबंध :** पर्यावरण उपक्रमात इतरांसोबत काम केल्याने एकटेपणा कमी होतो आणि सामाजिक बंध दृढ होतात. सामूहिक प्रयत्न मानसिक आधार देतात.

**माइंडफुलनेस :** पृथ्वीची काळजी घेताना आपण वर्तमानात जगतो. भविष्याची चिंता किंवा भूतकाळातील पश्चात्ताप कमी होतो.

**शारीरिक-मानसिक आरोग्याचा समतोल :** बाहेर फिरणे, झाडे लावणे, स्वच्छता मोहीम यामुळे व्यायामही होतो, जो नैसर्गिकरित्या एंडॉर्फिन्स सोडतो आणि मूड सुधारतो.

**काय करावे?**

**दररोज छोटे पाऊल :** एक दिवसात एक प्लास्टिक वस्तू कमी करा, आपल्या घराभोवती एखादे झाड लावा किंवा बाल्कनीत छोटे गार्डन तयार करा.

**निसर्गाशी जोड :** आठवड्यातून एकदा तरी निसर्गात वेळ घालवा. फोन बाजूला ठेवून फक्त पाहा, ऐका आणि अनुभवा.

**क्लायमेट ॲन्झायटीसाठी :** आपल्या भावना ओळखा, इतरांशी बोलून शेअर करा, सक्रिय कृती करा (जसे की पर्यावरण मोहिमेत सामील होणे). जर चिंता जास्त त्रास देत असेल तर मानसिक आरोग्य व्यावसायिक (मनोविकारतज्ञ किंवा मानसोपचारतज्ञ, मानसशास्त्रज्ञ) यांच्याकडे मदत घ्या. ज्या पृथ्वीवर आपण राहतो, तिची काळजी घेतल्याने आपण स्वतःचीही काळजी घेतो. विश्व पर्यावरण दिन आपल्याला सांगतोय, स्वच्छ पृथ्वी, स्वस्थ मन. आपण सर्वांनी मिळून हिरवीगार, शांत आणि निरोगी भविष्य घडवूया. आपल्या मानसिक आरोग्याची काळजी घ्या, कारण तेही पर्यावरणाचाच एक भाग आहे.●●




# साद घालतो कबीर

आपल्या भारतात वेशभूषेला, बाह्यात्कारी दिसण्याला बरेच लोकं फसतात. विशिष्ट रंगाचे कपडे, गळ्यात चार माळा, कपाळाला गंध, अंगाला राख.. असे काही दिसले की आमची लोटांगणे सुरु. खरेच तो साधु ज्ञानी आहे का? याचा आपण काही एक विचार न करता त्याला सपेशल शरण जातो. यावर कबीर जनसामान्यांना बजावतात. ते सांगतात-

**साधु भया तो क्या भया**
**माला पहिरी चार**
**बाहर भेष बनाईया**
**भीतर भरी भंगार**

अरे... तो साधु झाला म्हणून काय झाले? साधूच्या पेहरावावर किंवा त्याने गळ्यात घातलेल्या चार माळांवर भाळून जाऊ नका. वरकरणी ज्ञानी वाटणाऱ्या या साधुजवळ काहीच ज्ञान नसते. असे साधु भंगारासारखे टाकाऊ असतात. संत तुकाराम महाराज देखील कबीराचा हा विचार पुढे नेताना आपल्या अभंगात सांगतात -

**ऐसे कैसे झाले भोंदू**
**कर्म करोनि म्हणती साधु**
**अंगी लावूनिया राख**
**डोळे झाकुनी करिती पाप**
**दावुनि वैराग्याची कळा**
**भोगी विषयांचा सोहळा**
**तुका म्हणे सांगो किती**
**जळो तयाची संगती**

संत तुकाराम महाराज म्हणतात, अरे, हे वरवर वाटणारे साधू..पाखंडी कृत्य करणारे असतात. अंगाला राख फासून दुष्कृत्ये करतात. इतरांना वैराग्य सांगायचे आणि स्वतः मात्र कामवासनेने बरबटलेले असतात. यांची संगती नको रे बाबा....●●



प्रा. वसंत वावरे
मो. 9403304670

# शिक्षणासाठी गांव सोडले
# शिवराम बगन भलावी

सन १९८४ उजाडले जानेवारी संपला फेब्रुवारी १९८४ ला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा पास झालो. ICAR ची फेलोशीच उत्तीर्ण कृषी अधिकारी परीक्षा पास मुंबइला mpsc ची मुलाखत झाली. माझी निवड R.F.O वनपरिक्षेत्राधिकारी या पदासाठी झाली. माझ्याकडे तीन पर्याय होते. मला नौकरी करणे गरजेचे होते. रेंजर RFO पदासाठी एक वर्षाचा परिविक्षा कालावधी चिखलदरा, जि. अमरावती येथे पूर्ण करून वनविभागात कोंढाळी (जि. नागपूर) परिक्षेत्रात वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून रूजु झालो. १ एप्रिल १९८५ ला वनपरिक्षेत्र विभागात वनसेवा निमित्त सचोटीने, प्रामाणिकपणे आपले कर्तव्य करीत गेलो. यानंतर मी मागे वळून पाहिले नाही. मी घर, गाव, शेती आणि वेळ मिळाल्यास समाजसेवा, आईवडीलांची सेवा याकडे दुर्लक्ष केले नाही. प्रथम प्राधान्य माझे वनसेवाला होते. नोकरी असतांना खूप नविन गोष्टी अनुभवाने मी शिकत गेलो. चवदा वर्षे रेंजर, एसीपी म्हणून चवदा वर्षे, २०१३ ला डीएफओ म्हणून नागपूरला पदोन्नती, कर्तव्य बजावत असतांना महाराष्ट्र शासनाने वन व वन्यजीव संरक्षण या उत्कृष्ट कार्यासाठी मला सन२०१६ मध्ये सुवर्णपदक व प्रशस्ती पत्रक देऊन गौरविण्यात आले. IFS अवार्ड २०१९ (भारतीय वन सेवा) : विभागीय वन अधिकारी वन्यजीव व प्रबंधक २ या पवर प्रधान मुख्य वन संरक्षक नागपूर येथे कार्यरत होतो. दि. ३१.१०.२०१९ ला वनविभागाचा सर्वोच्च पुरस्कार IFS अवार्ड २०११ प्राप्त झाला. माझ्या जीवनसंघर्षातील सर्वात मोठा मानसन्मानाचा सोनेरी क्षण होता. वनसेवेत असतांना उत्कृष्ट कार्य केल्याची IFS AWARD माझ्यासाठी यशाचा गौरवशिखर होता. तदनंतर ३ वर्षे सेवा करण्याची संधी मला प्राप्त झाली. भंडारा वनविभाग, भंडारा येथे उपवन संरक्षक या पदावर पदोन्नती झाली. वनाचे संरक्षण, वन्यजीवाचे रक्षण तथा संवर्धन करीत माझी नाळ जल, जंगल, जमीनशी जुळत गेली. जवळपास सदतीस वर्षे निष्ठापूर्वक, निःस्वार्थ वनसेवा प्रामाणिकपणे केली. याची पावती म्हणजे IFS अवार्ड २०१९ होय. दिर्घकाळ यशस्वी वनसेवा पूर्ण करून दि. ३१ जानेवारी २०२२ रोजी उपवनसंरक्षक पदावरून भंडारा येथून सेवानिवृत्त झालो. सामाजिक,

आदिवासी अस्तित्व



प्रा. डॉ. वामन शेळमाके
मो. 9420973248




शैक्षणिक, सांस्कृतिक विविध संघटनांना आर्थिक मदतीचा हात नेहमी पुढे राहिला. सभा संमेलनातून क्रांतीयोद्धा बिरसा मुंडा, राजमात महाराणी दुर्गावती यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल, प्रेरणादायी विचार गोंडी भाषेतनू व्यक्त करण्याचे धाडस मी केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आणि योग्य मार्गदर्शन केले. सेवानिवृत्तीनंतर समाजसेवा हे माझे ध्येय आहे. बालपणापासून माझे प्रेरणास्थान आदिवासींचे झुंझार नेते बाबुरावजी मडावी, निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते तुळशिराम वरकडे, कवी प्रभुलाल परतेती आणि माझे आईवडील आहेत. आदिवासी समाजातील युवक युवतींनी उच्च शिक्षणकडे दुर्लक्ष करू नये. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी फक्त शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. व्यसनापासून तथा वाईट सवयींच्या आहारी जावू नये, जितके दूर राहता येईल यासाठी प्रयत्न करावा. स्वतःच्या पायावर उभे राहून समाजाला मदत करावी आणि देशसेवा करून समाजाचे नाव जगाच्या इतिहासात अंकीत करावे अशी संदेशवजा माझी विनंती आहे. आदिवासी समाजाची आपसातील मतभेद विसरून मुलामुलींना खूप शिकवा, मोठे करा, समाजाला संघटीत, मजबूत करा. आदिवासी एकता म्हणजे विकास आणि उत्थानाचा मूलमंत्र आहे. आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी खूप अभ्यास करावे, आता खूप सोयी सवलती उपलब्ध आहेत. ही सुवर्णसंधी आहे. आमच्या काळात त्या नव्हत्या. एकच गोष्ट लक्षात ठेवावी. शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत करून शासन प्रशासनामध्ये सर्वोच्चपदी विराजमान होऊन समाजाचे, राज्याचे, देशाचे नाव जगाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी अंकित करावे अशी मनिषा बाळगतो.●●

# शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी व विद्यार्थी आत्महत्या
# जबाबदारी कोणाची?

देशाच्या भवितव्याचा पाया असलेले विद्यार्थी आज भीती, नैराश्य आणि असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलले जात आहेत. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, पुनर्परीक्षा, वाढता मानसिक ताण आणि त्यातून घडणाऱ्या आत्महत्या या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. त्या आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या गंभीर अपयशाचे प्रतिक बनल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलेले खुले पत्र देशातील लाखो विद्यार्थी आणि पालकांच्या वेदनेला शब्द देणारे ठरले आहे. या पत्रात अलिकडच्या काही आठवड्यांत ११ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यापैकी पाच विद्यार्थ्यांचे मृत्यू अवघ्या ४८ तासांत झाले. ही आकडेवारी केवळ संख्या नाही तर ती उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांची, तुटलेल्या स्वप्नांची आणि व्यवस्थेवरील विश्वास गमावलेल्या तरुणाईची वेदनादायी कहाणी आहे. प्रत्येक आत्महत्येमागे एका कुटुंबाचा संघर्ष, त्याग आणि मुलांच्या भविष्याविषयीच्या अपेक्षा दडलेल्या असतात. आज शिक्षण हे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सर्वात मोठी गुंतवणूक बनले आहे. मुलांना डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी किंवा इतर प्रतिष्ठित क्षेत्रांत पोहोचवण्यासाठी पालक कर्ज काढतात, जमीन विकतात आणि आयुष्यभराची बचत खर्च करतात. मात्र परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार, पेपरफुटी आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले की या कुटुंबांवर दुहेरी संकट कोसळते. एकीकडे मुलाचे निधन आणि दुसरीकडे आर्थिक विनाश. याच पार्श्वभूमीवर दिपके यांनी आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. या मागणीचा गाभा आर्थिक मदतीपेक्षा राज्याच्या नैतिक जबाबदारीशी संबंधित आहे. जर व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. केवळ शोक व्यक्त करून किंवा चौकशी समित्या नेमून शासनाची जबाबदारी संपत नाही. गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटना वारंवार घडल्या आहेत. लाखो विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षा देतात आणि नंतर पेपरफुटीमुळे पुनर्परीक्षेची वेळ येते. यामुळे केवळ वेळ आणि पैसा वाया जात नाही, तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो. मेहनतीपेक्षा गैरव्यवहाराला महत्त्व मिळत असल्याची भावना तरुणांच्या मनात निर्माण होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची बाब आहे. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे शिक्षण व्यवस्थेचे वाढते व्यापारीकरण. महागडे कोचिंग क्लासेस, वाढती फी, स्पर्धेचे प्रचंड दडपण आणि यशाला दिले जाणारे अवास्तव महत्त्व यामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत आहे. अनेकदा अपयश हे जीवनाचा भाग आहे हे सांगण्याऐवजी त्याला कलंक मानले जाते. परिणामी अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या एकाकी पडतात. आत्महत्या ही वैयक्तिक कमकुवतपणाची नव्हे, तर सामाजिक आणि संस्थात्मक अपयशाची घटना असते, हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आली आहे. दिपके यांच्या पत्रात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेत उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक असते. मात्र केवळ एका व्यक्तीच्या बदलाने समस्या सुटणार नाही. परीक्षा प्रणाली, भरती प्रक्रिया, नियोजन यंत्रणा आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित धोरणांचे व्यापक पुनर्मूल्यांकन करणे तितकेच गरजेचे आहे.



प्रविण बागडे
9923620919

आज विद्यार्थी सरकारकडे केवळ नोकऱ्या किंवा परीक्षा मागत नाहीत तर ते न्याय आणि पारदर्शकता मागत आहेत. त्यांना खात्री हवी आहे की त्यांच्या मेहनतीची चोरी होणार नाही. त्यांना अशी व्यवस्था हवी आहे जिथे भ्रष्टाचाराला संरक्षण मिळणार नाही आणि प्रामाणिक प्रयत्नांना योग्य संधी मिळेल. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा पाया असतो. तोच जर ढासळला तर सामाजिक अस्थिरता निर्माण होण्याचा धोका वाढतो.




विद्यार्थी आत्महत्यांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा सामाजिक न्याय, शिक्षणाचा अधिकार आणि मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. एखादी रेल्वे दुर्घटना किंवा पूल दुर्घटना घडली तर जबाबदारी निश्चित केली जाते. मग विद्यार्थ्यांच्या मृत्यूंच्या मालिकेनंतरही शिक्षण व्यवस्थेतील दोषींना जबाबदार का धरले जात नाही, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. या परिस्थितीत व्यापक सुधारणांची गरज आहे. परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा, पेपरफुटी विरोधी कठोर कायदे, दोषींवर तातडीने कारवाई, विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य सहाय्य केंद्रे, मोफत समुपदेशन सेवा आणि पालकांसाठी जागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच आत्महत्यांच्या घटनांचा सखोल अभ्यास करून त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय कारणे शोधली पाहिजेत. दिपके यांचे पत्र हे केवळ एका राजकीय पक्षाचे निवेदन म्हणून पाहण्यापेक्षा शिक्षण व्यवस्थेला विचारलेला अस्वस्थ करणारा प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे. देशाचा तरुण वर्ग जर आशाहीन झाला, तर कोणत्याही राष्ट्राचे भविष्य सुरक्षित राहू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जिवंत ठेवणे ही केवळ पालकांची नव्हे, तर राज्याचीही जबाबदारी आहे. आज प्रश्न एकाच विद्यार्थ्याचा किंवा एका परीक्षेचा नाही. प्रश्न आहे त्या संपूर्ण पिढीचा जी आपल्या भवितव्यासाठी संघर्ष करत आहे. त्यांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे देशाच्या भविष्याकडे दुर्लक्ष करणे होय. आता प्रश्न एवढाच आहे की विद्यार्थ्यांच्या मृत्यूंचा हिशोब कोण देणार? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे भविष्यात असा प्रश्न पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी शासन, प्रशासन आणि समाज कोणती ठोस पावले उचलणार? कारण प्रत्येक हरवलेला विद्यार्थी हा केवळ एका कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण राष्ट्राचा अपूर्ण राहिलेला भविष्यकाळ असतो.●●

“ संयम आणि मेहनत हे यशाचे खरे साथीदार आहेत... ”



# महार महाराष्ट्र व मराठा

आज आपण 'जय महाराष्ट्र' असे मोठ्या अभिमानाने बोलतो व तशा घोषणाही देतो. पण खरच महाराष्ट्र हा शब्द कसा तयार झाला? त्या महाराष्ट्राचे मूळ रहिवासी कोण? त्याचा मूळ इतिहास काय? याचा कधी कोणी विचार केलाय किंवा यावर कोणी आजपर्यंत मूळातून संशोधन केले आहे का? तसेच ज्यांनी केलेले आहे त्यांचे संशोधन सत्य मानून त्याचा आजपर्यंत प्रचार, प्रसार कोणी आपल्या प्रबोधनातून केला आहे का किंवा तो समजून घेऊन तसे बौद्धिक वर्तन आजपर्यंत करण्यास आपण शिकलो आहोत का? या सर्वच प्रश्नांची उत्तरे मूळातून समजून घेणे गरजेचे आहे. महार समाजाच्या वस्तीला महाराष्ट्रात दोन नावे आहेत. उत्तर महाराष्ट्रात म्हणजे कोकणात त्यांच्या वस्तीला 'मोठ्या घरचे किंवा राजवाडा' असे म्हणतात. तर पूर्व महाराष्ट्रात त्यांच्या वस्तीला 'महारवाडा किंवा राजवाडा' असे म्हणतात. पण या दोन्ही भागात म्हणजे कोकणातल्या व घाटावरच्या समाजाच्या बोलीभाषेत 'राजवाडा' हा शब्द समान आहे. मग राजवाडा शब्द कसा दृढ झाला व त्यामागचा इतिहास काय? याचा विचार करता आपल्याला थोर मानववंशशास्त्रज्ञा इरावती कर्वे यांच्या 'परिपूर्ती' या पुस्तकाचा आधार घ्यावा लागेल. कारण या पुस्तकात 'महार तिथपर्यंत महाराष्ट्र' असा एक संशोधनपर लेख आहे. या लेखात त्यांनी याचा उलगडा केलेला आहे. यात त्यांनी महाराची वस्ती गावाच्या पूर्वेला असल्याचे एक प्रमुख कारण दिलेले आहे. ते कारण म्हणजे गाव निर्मिताचा शोधच महारांपासून सुरू झालेला असावा. कारण महारांनी अगोदर नदीकाठी वस्ती केली असावी व त्यानंतर आलेल्या लोकांना त्यांनी आपल्या पाठीमागे वस्ती करून रहाण्यास सांगितले असावे. कारण आपल्या वस्तीसमोर दुसऱ्या कोणी मागावून येवून वस्ती करून रहावे याला सहजासहजी आजही कोणी तयार होत नाही. कारण हि माणसाची एक मानसिक प्रेरणा आहे. यामुळे गावांचा शोध किंवा निर्मिती हि महारांच्या वस्तीवरून लागला असे त्यांचे संशोधन आहे. तसेच त्या याहीपुढे जावून असेही सांगतात की, 'जिथ पर्यंत महार तिथपर्यतच महाराष्ट्र' कारण महाराष्ट्रात असे एकही गाव नाही कि त्या गावात महारांची वस्ती नाही. याहिपेक्षा विशेष म्हणजे जिथे महाराची वस्ती संपते तेथून इतर राज्यांच्या सीमा सुरू होतात. तसेच दुसरे असे की, महाराष्ट्रातील सर्वच जात समुहाचे लोक सगळ्याच गावात सापडतात असे नाही. तर काही ठिकाणची गावे हि एकजात आदिवासींची आहे व तिथे मराठा, ओबीसी जातींची माणसे औषधालाही सापडत नाहीत. पण महार जतीचे एक का होईना घर सापडतेच. यामुळे महाराष्ट्राची मूळ जात ही महार आहे हे प्रथम सिद्ध होते. यामुळेच महारांच्या वस्तीला 'मोठ्या घरचे' असे म्हटले जात असावे हे सिद्ध होते. आता महारांच्या वस्तीला 'राजवाडा' हे नाव कसे पडले.




तर याचीही माहिती याच मानववंशशास्त्रज्ञा इरावती कर्वे पुरवताना त्या म्हणतात 'महाराष्ट्राच्या मातीत महारांच्या नागवंशाचे महारराजे होवून गेल्याची यादी मिळते. यात शेषनाग, आनंतनाग, शिशुनाग, तक्षक, महारपदमनाग, वासुनाग, कंबनाग, शंखनाग या राजांची नावे आहेत. यामध्ये आनंतनाग याचे राज्य माहारठ्ठ ते हिमालयातील 'कसमुरीदंभ' या नदीपर्यंत पर्यंत पसरलेले होते. आता हि कसमुरीदंभ नदी लडाख म्हणजे पाकिस्तानच्या सीमेवर आहे. म्हणजेच थोडक्यात इतके शूर व सुराज्य संपन्न राजे महारांच्या नागवंशात होऊन गेल्याचा पुरावा मिळतो. मग या राज्यात फक्त महार हा एकमेव समाजच होता का? असा प्रश्न सहज पडतो. तर तसे नाही तर आजचे ओबीसी व आदिवासी हा समाज या महार राजांची प्रमुख रयत होती. म्हणजेच मूळभारतीय म्हणून आज जे जे आहेत व फक्त परकीय आर्य ब्राह्मण व मराठा सोडून जे जे आहेत, तो सर्व समाज हा या महारराजांची रयत होताा व हे सर्व गुण्यागोविंदाने एकत्र रहात होते. असा त्याचा अर्थ िनिघतो. यामुळेच महारांच्या वस्तीला 'राजवाडा' हा शब्द रूढ झालेला आहे हे समजून येते. यामुळेच मराठी भाषेत 'महाराज' हा शब्द 'महारराज' या शब्दावरूनच तयार झाला असे अनुमान निघते. महारराज म्हणजेच महारांचा राजा होय. म्हणजेच महारराज - महाराज असा हा शब्द काळानुसार बदलत आलेला आहे. या शब्दांच्या बदलालाच अपभ्रंश म्हणतात. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. महाराज हा शब्द जसा महारराज या शब्दावरून तयार झाला, तसाच महाराणी हाही शब्द तयार झालेला आहे. कारण आजही महार स्त्रिया घोळक्याने चालल्या तर तुच्छतेने त्यांच्याकडे बघून इतर लोक 'महारणी' चालल्या असे अनेकवचनाने बोलतात. पण तो शब्द महारणी असा नसून तो 'महाराणी चालल्या' असा आहे. म्हणजेच 'महाराणी' या शब्दाचा 'महारणी' हा अपभ्रंश आहे. यानंतर इतिचहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी तर महाराष्ट्र नामाची व्याख्याच सांगितलेली आहे. राजवाडेंचे म्हणणे असे की, 'महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र.' म्हणजेच महाराष्ट्र हा शब्दच मूळात महार या जातनामा वरून तयार झालेला आहे. मग प्रश्न हा पडतो की, महाराष्ट्राला महाराष्ट्र हे नाव मिळण्याअगोदर किंवा पडण्या अगोदर महाराष्ट्राचे नेमके नाव काय होते? तर याचे उत्तर इरावती कर्वे यांनी अगोदरच देऊन ठेवलेले आहे आणि ते उत्तर म्हणजे 'माहारठ्ठ' हे होय. म्हणजेच माहारठ्ठ हा शब्द जसा राष्ट्रवाचक आहे, तसाच तो भाषा वाचकही आहे. कारण महार राजांची भाषा कोणती होती? असा जर प्रश्न कोणी आज केला तर, ती भाषा 'मराठी' होती असेच सांगावे लागते. तेंव्हा 'माहारठ्ठ' आणि मराठा या जातीच्या नावाचा कोणताही जवळचा सुताराम आणि कवडीचाही संबंध नाही. कारण महार, ओबीसी, आदिवासी हे जसे महाराष्ट्राचे भूमिपुत्र व महाराष्ट्राचे मूळरहिवासी आहेत, तसा मराठा समाज नाही. कारण मराठ्यांचे मूळ हे मूळचे राज्यस्थानातले आहे. कारण छ. शिवरायांनी गागभट्टाला शिवराज्याभिषेका वेळी जी वंशावळ दिली ती राज्यस्थानातील सिसोदिया घराण्याची आहे. तसेच कोल्हापूर घराण्याचे राजर्षी शाहू महाराज यांचीही वंशावळ हि राज्यस्थानातील त्याच सिसोदिया घराण्याची आहे. एवढेच नाही तर याच राजर्षी शाहू महाराजांचे खरे आडनाव भोसले नसून ते राठोड असे आहे व हा सारा म्हणजेच राठोड - घाटगे - भोसले असा त्यांच्या आडनावाचा संपूर्ण प्रवास आहे व हा सारा इतिहास त्यांच्याच गौरवग्रंथात दिलेला आहे. तसेच शाहू महाराजांची वंशावळही याच गौरव ग्रंथाच्या सुरवातीलाच पहिल्याच पानावर छापलेली आहे. एवढेच नाही तर आजही महाराष्ट्रातील मराठा समाजाची वंशावळ लिहून नेण्यासाठी राज्यस्थानातून कायम भाट येतात. मग या साऱ्या पुराव्यांवरून मराठा समाज हा महाराष्ट्राचा मूळरहिवासी कसा काय होवू शकतो? तो महाराष्ट्राचा रहिवासी आहे, पण मूळचा नाही. याचे उत्तर मूळभारतीय संशोधकांनीही कधी शोधले नाही व मराठा समाजानेही कधी सांगितले नाही. उलट ब्राम्हणी लेखकांनी आमच्यावर अन्याय केला व छ. शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे विद्रुपीकरण केले असा टाहो फोडून मूळभारतीय समाज आपल्या बाजूने वळवण्याचाच आजपर्यंत त्यांनी जोरदार प्रयत्न केला. पण मराठा समाजाने छ. शिवरायांच्या नावाचा वारंवार वापर करून, मूळभारतीयांवर कायमच अन्याय-अत्याचार केला त्याचे काय? व 'एक मराठा लाख मराठा' असे तलवार उपसून 'जय शिवाजी - जय भवानी' म्हटले त्याचे काय? मराठा समाजाची तर आजपर्यंतची सारी प्रगती ही मुळभारतीयाच्या नरडीवर पाय देऊन व ब्राम्हणांच्या शेजारी बसूनच झलेली आहे. म्हणजेच सरळ सांगायचेच झाले तर मराठा समाजाला राजकीय सत्तेसाठी ब्राम्हण चालतात. पण मूळभारतीय समाज चालत नाही. याअगोदर दलित समाजालाच ते आपला वैरी व दुष्मन मानून त्यांच्यावर अन्याय अत्याचार करत होते. पण आता त्यांना आदिवासी व ओबीसी समाजही चालत नाही. आता तर त्यांनी ओबीसी समाजालाच मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून नंबर एकचा शत्रू मानायला सुरवात केलेली आहे. सांगायचा मुद्दा असा की, आजपर्यंत दलित, ओबीसी, आदिवासी व मुस्लिम यांच्यात जसा सामाजिक समन्वय टिकून आहे व तो पूर्वीपासूनचाच आहे. तसा मराठा समाजाने महाराष्ट्रातील कोणत्या मूळभारतीय समाजासी आपला सामाजिक समन्वय आजपर्यंत टिकवून ठेवलेला आहे, हा एक मोठा संशोधनाचाच भाग आहे. याचे मूळ कारण म्हणजे ते महाराष्ट्राचे मूळ रहिवासी नाहीत हे होय. यामुळेच त्यांच्या मनमस्तकात व मेंदूत मूळभारतीय महाराष्ट्रीयन समाजा विषयी कोणतीच आपुलकी व अस्मिता नाही. आहे ती फक्त घृणा व तिरस्कारच आहे. यामुळे हा सामाजिक बदल इतिहासाच्या सत्यरूपी उत्खननाने झाला की तो, बदलत्या काळाचा महिमा आहे, हे सांगणे जरी आज आवघड असले तरी, इतिहास हा असा सत्यस्वरूपाचा आहे. हे आज तोंड वाकडे करून का होईना प्रत्येकाला मान्यच करावे लागेल. महार व महाराष्ट्र यांचे हे पिढ्यांपिढ्यांचे भूमीपुत्राचे व जन्मभूमीचे नाते आहे. तो इतिहास कोणी कितीही अक्कल हुशारीने अथवा कपट कारस्थानाने बदलवण्याचा प्रयत्न केला, तरी तो कोणी बदलवू शकत नाही. कारण इतिहास हा त्या त्या काळाचे अपत्य असतो व त्याचे जतन व संरक्षण हे त्याच स्वरूपात करावे लागते. इतिहासाला इतिहासच साक्ष असतो व इतिहास हा इतिहासरूपानेच समजून घ्यायचा असतो. कालच्या इतिहासाला आजचे नियम चालत नाहीत. जर ते लावण्याचा कोणी प्रयन्त केला तर त्या प्रयत्नाने बाप बदलल्यासारखे कधीच होत नाही. कारण सरतेशेवटी बाप हा बापच असतो व तो कोणालाच बदलता येत नाही. तो स्विकारावाच लागतो. हे सत्य ज्याला समजते, त्यालाच इतिहास समजतो व त्यातून त्याला सत्याचा शोध लागतो आणि सत्यातून सत्याचाच भविष्यकालीन मार्ग सापडतो. ●●



दीपक गायकवाड
मो. 97650 46493

# कुळ

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

महत्वपूर्ण हे नाही की रावण विद्वान होता. महत्वपूर्ण हे आहे एक विद्वान देखील रावण असू शकतो. हे सांगायचे कारण म्हणजे समाजात ज्यांना आपण आदर्श मानतो अशा कितीतरी हुशार म्हणवल्या जाणाऱ्या व्यक्तीत देखील एक राक्षस दडलेला असल्याची अनेक उदाहरणे आहेत. अशा प्रवृत्ती पासून दूर राहणे हा अहंकाराचा भाग नाही. तर स्वतःला सावरणे आणि सावधगिरी बाळगणे हा एकमेव उपाय असतो. ज्यांना आपण विद्वान म्हणून मानमान्यता देतो. तर वेळप्रसंगी हिच मंडळी आपल्यालाच तुच्छ समजते. आणि आपली किंमत करायला विसरते. जे काही ह्या जगात सुरू आहे ते केवळ आपल्यामुळेच सुरू आहे असा ह्यांचा भ्रम असतो. अंधारात दिवा घेऊन चालणाऱ्या व्यक्तीला ज्याप्रमाणे गैरसमज होतो की, आपण दिवा घेऊन चालत आहोत पण वस्तुस्थिती अशी असते की, दिवा हा समोरच्या व्यक्तीला घेऊन चालत असतो. ही रावणाची प्रवृत्ती कुणातही येऊ शकते. बरेचदा आपल्याला वाटते की, अमुक एक व्यक्ती ही खुप चांगल्या कुळात जन्माला आली आहे म्हणजे ती व्यक्ती देखील चांगली असेल असे नाही कारण ज्याप्रमाणे, दुध, दही, ताक, लोणी आणि तूप हे सर्व पदार्थ जरी एकाच कुळातील असले तरी प्रत्येकाची किंमत ही वेगवेगळी असते. श्रेष्ठता ही जन्माने नव्हे तर आपल्यातील गुण, कला आणि कर्माने प्राप्त होते. वाईट वृत्तीच्या माणसांना काही काळासाठी जरी प्रतिष्ठा मिळाली तरी ती प्रतिष्ठा सत्यता कळल्यावर नाहीसी होते मात्र तरीही ह्या मंडळींना सतत असे वाटते की आपली प्रशंसा, स्तुती, आदर आणि सन्मान सतत केल्या गेला पाहिजे. 'तारीफ की चाहत तो नाकाम लोगों की फितरत है, काबिल लोगों के तो, दुश्मन भी क़ायल होते है.●●

बहुजन सौरभ

# दीक्षाभूमी! श्रद्धा आणि जबाबदारी

**दीक्षाभूमी ही केवळ एक वास्तू नाही; ती आपल्या श्रद्धेची, आस्थेची, स्वाभिमानाची आणि सामाजिक क्रांतीची पवित्र भूमी आहे. हीच ती भूमी आहे जिथून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा संदेश जगभर पोहोचला. लाखो-कोट्यवधी आंबेडकरी, बौद्ध आणि मानवतावादी विचारांच्या लोकांसाठी दीक्षाभूमी हे प्रेरणास्थान आहे.**

मात्र अत्यंत खेदाने आणि जड अंतःकरणाने असे म्हणावे लागते की आज या ऐतिहासिक वास्तूची अवस्था चिंताजनक झाली आहे. जणू एखादा जखमी सैनिक रणांगणावर वेदना सहन करत पडला आहे आणि आपण असहायपणे ते दृश्य पाहत आहोत.

दीक्षाभूमीच्या भव्य स्तूपाचे नियमित संगोपन, देखभाल आणि संरक्षण अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होणे आवश्यक असताना त्याबाबत कोणतीही प्रभावी व्यवस्था दिसून येत नाही. स्तूपाच्या पहिल्या मजल्यावरील सुरक्षा भिंतींना अनेक ठिकाणी भेगा पडल्या आहेत. काही ठिकाणी प्लास्टर निघाले असून लोखंडी सळ्या बाहेर आलेल्या आहेत. पायऱ्यांवरील आणि आतील भागातील अनेक टाइल्स उखडलेल्या आहेत. मुख्य प्रवेशद्वारावरील कलाकृतींचीही हानी झाली आहे.

तथागत भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी व प्रतिमांना अभिवादन करण्यासाठी जाणाऱ्या मुख्य मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. धम्मचक्र प्रवर्तनाला सहा दशकांहून अधिक काळ लोटला असतानाही या मार्गाचे आधुनिकीकरण झालेले नाही. भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या मार्गदर्शक संरचनाही जुनाट आणि अपुऱ्या आहेत.

जगभरातून लाखो अनुयायी येथे भेट देतात; परंतु पिण्याच्या स्वच्छ पाण्याची, आधुनिक स्वच्छतागृहांची, प्रतिक्षालयांची, कॅन्टीनची आणि विश्रामगृहांची पुरेशी व्यवस्था नाही. इतक्या महत्त्वाच्या जागतिक दर्जाच्या स्मारकासाठी ही परिस्थिती निश्चितच शोभणारी नाही. परिसर संरक्षणासाठी उभारण्यात आलेली संरक्षक भिंत काही काळापूर्वी हटविण्यात आली; मात्र त्याऐवजी अद्याप कायमस्वरूपी व्यवस्था उभारण्यात आलेली नाही. सुशोभीकरणाच्या कामांमुळे निर्माण झालेल्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून ते स्मारकाच्या दिशेने झिरपत असल्याच्या तक्रारी आहेत. काही ठिकाणी तात्पुरत्या ताडपत्री लावून परिस्थिती हाताळली जात आहे. हे उपाय कायमस्वरूपी समाधान देणारे नाहीत.

विशाल आर्यबोधी
मो.92708 51147

सौंदर्यीकरणाच्या नावाखाली अनेक झाडे आणि हिरवळ नष्ट झाल्याची भावना भाविकांमध्ये आहे. पर्यावरणीय समतोल राखत विकास होणे आवश्यक असताना परिसराचे काँक्रीटीकरण वाढल्याचे दिसते.

आज प्रश्न असा आहे की आपण ही परिस्थिती केवळ पाहत राहणार आहोत का? दीक्षाभूमीच्या विकास, संरक्षण आणि संवर्धनासाठी सामूहिक जबाबदारी




स्वीकारणार आहोत का? या ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी संबंधित व्यवस्थापन, शासन आणि समाज या तिन्ही घटकांनी आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे.

दीक्षाभूमीचा सर्वांगीण विकास, सौंदर्यीकरण आणि भाविकांसाठी अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यासाठी सीआयसीआर (केंद्रीय कापूस संशोधन संस्था) परिसरातील उपलब्ध जमीन तसेच उत्तर दिशेला असलेली कृषी विभागाची जमीन दीक्षाभूमीला हस्तांतरित करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. या मागणीची पूर्तता झाल्यास दीक्षाभूमीचा नियोजनबद्ध विस्तार होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर दीक्षाभूमीच्या विकास व सौंदर्यीकरणासाठी येत्या १ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सीआयसीआर गेट, काचीपुरा चौक, दीक्षाभूमी, नागपूर येथे आयोजित आंदोलनात महाराष्ट्रभरातील बौद्ध, आंबेडकरी आणि संविधानप्रेमी जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

दीक्षाभूमी ही केवळ नागपूरची नव्हे, तर संपूर्ण मानवतेच्या सामाजिक परिवर्तनाची प्रेरणाभूमी आहे. तिचे संरक्षण, संवर्धन आणि विकास ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.●●

**नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ज्या मोठ्या फरकाने दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे, तो निकाल म्हणजे आंबेडकरी समाजाने पक्षाच्या स्थानिक पातळीवरील चुकीच्या धोरणांविरोधात दिलेला स्पष्ट कौल आहे.**

# कांग्रेसचा दारूण पराभव, शिक्षित घटकांना डावलल्याचा परिणाम

माजी नगरसेवक ॲड. यशवंत मेश्राम यांनी या निकालावर सविस्तर भाष्य करताना म्हटले आहे की, या मोठ्या पराभवाची बीजे मागील नागपूर महानगरपालिका निवडणुकांमध्येच रोवली गेली होती. स्थानिक नेत्यांनी स्वतःचे वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी ज्या सोयीच्या राजकारणाचा पाया घातला, त्याचे हे अत्यंत नुकसानकारक फळ आज संपूर्ण काँग्रेस पक्षाला भोगावे लागत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला शिक्षणाचा सर्वोच्च मूलमंत्र दिला आहे. त्यामुळे आंबेडकरी समाजात शिक्षणाला आणि वैचारिक प्रगल्भतेला सर्वाधिक महत्त्व दिले जाते. मात्र, महानगरपालिका निवडणुकीच्या वेळी तिकीट वाटप करताना काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाने समाजातील अत्यंत उच्चशिक्षित, अभ्यासू आणि सक्षम नेतृत्वाला जाणीवपूर्वक डावलले. पक्षातील काही नेत्यांना केवळ त्यांच्या तालावर नाचणारे आणि हुकूम पाळणारे बाहुले हवे होते. याच संकुचित हेतूने सुशिक्षित नेतृत्वाचा जाणीवपूर्वक बळी देण्यात आला आणि त्यांच्याऐवजी चक्क अशिक्षित व गुंड प्रवृत्तीच्या लोकांना उमेदवारी दिली गेली. समाजाचे नेतृत्व अशा अशिक्षित आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांच्या हाती सोपवण्याचा हा प्रयत्न म्हणजे आंबेडकरी समाजाच्या सर्वोच्च मूल्यांची आणि शिक्षणाची उघडपणे केलेली क्रूर चेष्टा होती. पक्षाची ही एकाधिकारशाहीची प्रवृत्ती केवळ एकाच समाजापुरती मर्यादित राहिलेली नाही; काँग्रेसने अत्यंत हुशारीने राज्यातील बहुसंख्य असलेल्या ओबीसी (OBC) समाज आणि अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील खऱ्या, सुशिक्षित आणि प्रामाणिक नेतृत्वालाही सत्तेत योग्य प्रतिनिधित्व न देता त्यांनाही बाजूला सारण्याचे धोरण अवलंबले आहे. यातून पक्षाचा सर्वसमावेशकतेचा बुरखा फाटला असून, विशिष्ट गटांचेच वर्चस्व राखण्याची त्यांची नीती उघड झाली आहे. आज काँग्रेस पक्षाला असे वाटू लागले आहे की दलित, आंबेडकरी समाजासोबतच मुस्लिम समाज म्हणजे त्यांच्या हक्काची कायमस्वरूपी 'व्होट बँक' आहे आणि या समाजांकडे काँग्रेसशिवाय दुसरा कोणताही राजकीय पर्याय उपलब्ध नाही. समाजाला इतके गृहीत धरण्याची आणि त्यांचा केवळ मतदानापुरता वापर करून घेण्याची काँग्रेसची ही प्रवृत्ती त्यांना आता महागात पडत आहे. मतांसाठी या समाजघटकांचा वापर करायचा, पण त्यांच्या खऱ्या आणि ज्वलंत प्रश्नांवर मात्र सोयीस्कर मौन बाळगायचे, हेच आता पक्षाचे धोरण झाले आहे. विशेषतः आंबेडकरी समाजाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास, नुकत्याच चर्चेत आलेल्या 'अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या' (Sub-classification of SC reservation) अत्यंत संवेदनशील मुद्द्यावर काँग्रेसने पाळलेले सोयीस्कर मौन हे याचेच सर्वात मोठे उदाहरण आहे. समाजाच्या अस्तित्वाशी आणि अधिकारांशी निगडित असलेल्या या गंभीर प्रश्नावर काँग्रेस पक्ष चकार शब्द काढत नाही, यावरून त्यांना समाजाच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे नसल्याचे सिद्ध होते. काँग्रेसला असे वाटले होते की केवळ भाजपकडून 'संविधान बदलण्याची' भीती दाखवली की हे सर्व समाजघटक निमूटपणे त्यांच्या मागे उभे राहतील. परंतु, काँग्रेसने आता या भ्रमातून बाहेर यावे. मात्र, आंबेडकरी समाज आता कोणाचाही राजकीय गुलाम राहिलेला नाही. हा समाज स्वतःच्या ताकदीवर उभा राहण्यास आणि आपले राजकीय भवितव्य ठरवण्यास पूर्णपणे सक्षम आहे. स्वतःच्या हितासाठी केवळ वापर करून घेणाऱ्या आणि ज्वलंत प्रश्नांकडे पाठ फिरवणाऱ्या कोणत्याही एका पक्षावर आंबेडकरी समाज अवलंबून नाही, हे या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या निकालाने अत्यंत स्पष्टपणे दाखवून दिले आहे. समाजाच्या या एकजुटीतून आणि रोषामधून सुरू झालेली काँग्रेसची ही घसरण इथेच थांबणार नाही. आगामी नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतही काँग्रेसला निश्चितपणे पराभवाचे तोंड पाहावे लागणार आहे. सुशिक्षित नेतृत्वाची गळचेपी करून आणि समाजाच्या प्रश्नांकडे पाठ फिरवून पक्षाचे जे नुकसान केले गेले आहे, त्यामुळे या आगामी पदवीधर निवडणुकीत विद्यमान काँग्रेस आमदार अभिजित वंजारी यांचा दारुण पराभव होणार, हे आता काळ्या दगडावरची रेघ आहे. हे समाज घटक अभिजित वंजारी यांचा पराभव घडवून आणतील आणि त्यांना धडा शिकवतील. ●●



ॲड. यशवंत मेश्राम
मो.98236 06970




# वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

## आरक्षण उपवर्गीकरण विशवेल पेरणाऱ्यांपासून सावध राहा...!

आज उपवर्गीकरणाच्या विरोधात बोलणारे काही जण समाजात संभ्रम, भीती आणि निराशेची विशवेल पेरत फिरत आहेत. त्यांच्या मांडणीतून मातंग समाजाला सतत हिणवले जाते, उपकाराची भाषा केली जाते, समाजाच्या नेत्यांना लक्ष्य केले जाते आणि संघर्षाची दिशा भरकटवण्याचा प्रयत्न केला जातो.१३ टक्के आरक्षणातील काही रोस्टर पॉईंट दाखवून समाजाला घाबरवले जात आहे. पण ते पुढील काळातील संपूर्ण चित्र सांगत नाहीत. रोस्टर ही केवळ संख्या नसून प्रतिनिधित्वाचे संतुलन साधणारी यंत्रणा आहे. ज्या घटकांना आजवर कमी संधी मिळाल्या, ज्यांचे प्रतिनिधित्व कमी राहिले, त्यांना न्याय मिळावा यासाठीच रोस्टरचा विचार केला जातो.

जर प्रतिनिधित्व आणि संधी यांचा वस्तुनिष्ठ विचार झाला, तर गेल्या अनेक दशकांतील लाभ आणि भविष्यातील लाभ यामध्ये नवे समीकरण निर्माण होऊ शकते. याच कारणामुळे काही जण अस्वस्थ आहेत. कारण आजवर ज्या संधी मोजक्या घटकांकडे केंद्रित झाल्या, त्या आता लाभवंचित समाजघटकांकडे वळण्याची शक्यता निर्माण होत आहे. खरा प्रश्न रोस्टरचा नाही... खरा प्रश्न आहे संधींच्या वाटपाचा...! खरा प्रश्न आहे प्रतिनिधित्वाच्या समतोलाचा...! खरा प्रश्न आहे लाभवंचितांना न्याय मिळण्याचा...! आजही काहींची मानसिकता अशी आहे की संपूर्ण आरक्षणावरील वर्चस्व कायम राहावे आणि इतरांनी वाटा मागू नये. पण समाज आता जागा होत आहे. आपल्या हक्कांची जाणीव त्याला होत आहे. बंधूंनो-भगिनींनो, इतिहास सांगतो की घरात बसून हक्क मिळत नाहीत. हक्क मिळवण्यासाठी संघटन, जनजागृती आणि संघर्ष करावा लागतो. उद्या जर आपण शांत बसलो, तर पुन्हा आपल्यालाच विचारले जाईल – 'तुम्हाला कोणी रोखले होते? तुम्ही आंदोलन का केले नाही? मागणी का लावून धरली नाही?' म्हणून हा निर्णायक क्षण आहे. - समाजापर्यंत सत्य पोहोचवा. - संभ्रमाचे जाळे फोडा.
- प्रत्येक तरुणाला संघर्षासाठी तयार करा. - गावागावात जनजागृती करा.
- महाराष्ट्रभर होणाऱ्या आंदोलनांत सहभागी व्हा. जो जागा आहे तोच हक्क मिळवतो. जो संघटित आहे तोच इतिहास घडवतो. जो संघर्ष करतो तोच भविष्य घडवतो. चला, समाजाला जागवूया... संघर्षाला बळ देऊया...
आणि न्याय्य हक्कांसाठी एकजुटीने उभे राहूया!

**– एकीकरण समिती**

# ब्रिटीश काळात डॉ. बी.आर. आंबेडकर यांना अटक का झाली नाही?

**ही एक अशी गोष्ट आहे जी अनेकांना माहीत नाही. भारत सरकारने गांधी आणि नेहरू यांना अनेकवेळा अटक केली, पण अनेक आंदोलनांचे नेतृत्व करणाऱ्या आंबेडकर यांना कधीच अटक का केली नाही, त्यामागची कारणे जाणून घेऊया.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रिटनमधील ज्या विद्यापीठांमध्ये त्यांनी शिक्षण घेतले, तिथे एक विशेष संघटना (Association) होती. जगातील नामांकित बुद्धीवंतांचाच या समुदायात समावेश केला जाई. आंबेडकरांकडे ही पात्रता असल्याने ते त्याचे सदस्य झाले. ज्यांना या संघटनेचे सदस्य व्हायचे असे, त्यांना जगातील सर्व देशांच्या संविधानाचे पूर्ण ज्ञान असणे हा एक नियम होता. सामान्य सुशिक्षित लोकांना याचे सदस्यत्व मिळत नसे. ज्या ब्रिटीश साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नसे, त्या साम्राज्यात या समुदायाच्या सदस्यांना विशेष मान, ओळख आणि पाठिंबा मिळत असे. ते सदस्य कोणत्याही देशात असले तरी, ब्रिटीश सरकार त्यांना कोणताही अपमान सोसावा लागणार नाही याची काळजी घेत असे.

डॉ. बी.आर. आंबेडकर भारतात राहत असताना, जर पोलिसांनी त्यांना अटक करायची असेल, तर त्या विद्यापीठाची किंवा संघटनेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते. भारतातील सडलेली सामाजिक व्यवस्था सुधारण्यासाठी आंबेडकरांनी अनेक आंदोलने केली.

एकदा एका पोलीस अधिकाऱ्याने डॉ. आंबेडकरांना अटक करण्याची धमकी दिली, तेव्हा डॉ. बाबासाहेब थोडे हसले आणि शांत राहिले.

दुसऱ्यांदा त्याच पोलीस अधिकाऱ्याने खरोखरच अटक करणार असल्याचे सांगितले.

हे ऐकून आंबेडकरांनी विचारले, 'अटक वॉरंट आहे का?'

ब्रिटीश पोलीस अधिकाऱ्याने अटक वॉरंट तयार करून परवानगीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवले. सरकारने ते पाहिल्यावर, आंबेडकरांना अटक न करण्याच्या नियमाची माहिती




नसल्यामुळे त्या पोलीस अधिकाऱ्याला नोकरीवरून निलंबित केले.

या विषयावर आंबेडकरांनी ब्रिटीश सरकारला विचारले, 'तुम्ही फक्त मला अटक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित केले, पण त्याला मदत करणाऱ्या इतर अधिकाऱ्यांचे काय?' परिणामी, ब्रिटीश सरकारने या प्रकरणात सामील असलेल्या इतर सर्व ब्रिटीश अधिकाऱ्यांनाही निलंबित केले. असे होते बाबासाहेब डॉ. बी.आर. आंबेडकर!

ब्रिटीश विद्यापीठाच्या त्या तत्कालीन संघटनेत संपूर्ण भारतातून फक्त एकच सदस्य होता आणि ते म्हणजे...'फक्त डॉ. बी.आर. आंबेडकर.●●'

**संकलन : मिरर व्हॉइस**

# आंबेडकरी चळवळीत समता सैनिक दलाची भूमिका




परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथील अन्याय पूर्ण जातीयवादी विषमतावादी व्यवस्थेविरोधी जन आंदोलन सुरू केले. त्यावेळी होणाऱ्या व्यवस्थेचे समर्थकाकडून विरोध त्याचा बंदोबस्त करण्यासाठी सेवानिवृत्त सैनिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट घेऊन संघटना मजबूत करण्यासाठी तरूणांना सैनिक शिस्त व अन्यायग्रस्त लोकांचे संरक्षण करण्यासाठी समता सैनिक दलाची आवश्यकता असून तरूणांना सैनिक शिक्षण देण्याची तयारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सहमती दिल्यानंतर समता सैनिक दलाची स्थापना करण्यात आली.

१९२७ साली महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पिण्याचे सत्याग्रह झाला. त्यावेळी समता सैनिक दलानी उत्तम कामगिरी केली.

ज्या ज्या वेळी आंदोलन झाले, त्यावेळी समता सैनिक दल प्रामाणिक व शिस्तीत राहून आंदोलन यशस्वी करण्याचे कार्य केले आहे.

१९४६ ला नागपूरात झालेल्या हिन्दु महारांच्या झगड्यात समता सैनिक दलाच्या सैनिकांनी होणाऱ्या हल्ल्याच्या विरोधात प्रति हल्ला करून जेरीस आणून आपल्या लोकांत विश्वास व धिर देऊन संरक्षण केले. त्या काळात आखाडा येथील तरूण मोठ्या प्रमाणात समता सैनिक दलात सहभागी होत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदेश शिरसावंद्य माणून समता सैनिक दल डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय पक्षाला मदत करीत असत. म्हणून विरोधक सुद्धा म्हणायचे की शिस्तपणा शिकायची असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता सैनिक दलाकडून शिकली पाहिजे.

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर काही वर्षे समता सैनिक दल एकत्रीतपणे कार्य करीत होता. त्यानंतर दलफुटीच्या मार्गाने चालू लागला. आता समता सैनिक दल व्यक्तीनिष्ठ झाला आहे. आंबेडकरी ध्येय धोरण, तात्विक भूमिका, संघर्ष करण्याची, समाजाला संरक्षण देण्याची भूमिका मागे पडत चालली आहे. दलसुद्धा सत्तेच्या कलांनी वावरताना दिसते. आज दलाचे अनेक विभागांत विभाजन झाले आहे. वेगवेगळे समता सैनिक दलाच्या शाखा भरतांना दिसतात. याचे विभाजन हे केवळ व्यक्तीची, नेतृत्वाची इच्छापूर्ती साठी लढताना दिसते. दल एकत्रीत झाला. एकसंघ झाला तर समाजावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडेल. राजकीय पक्षाचे विभाजन आहे. ते एकत्रित येण्यास दबावगट निर्माण होईल. विषम व्यवस्थाविरोधी लढा तीव्र करण्यासाठी मदत होईल. गरज आहे आपसातील अहंकार बाजूला करून समता, स्वातंत्र्य, समान न्याय, समान संधी, समान दर्जा निर्माण करण्यासाठी मदत होईल. बाबाचे स्वप्न साकार होईल.●●



विनायकराव जामगडे
मो.9372456389

25 June 2026 page 044_Layout 1 6/24/2026 6:38 PM Page 1



### स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १८४

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा येवला जि.नाशिक**



येवले जि. नाशिक जगप्रसिद्ध ठिकाण असून येथे डॉ. बाबासाहेबांचें भव्य स्मारक आहे. डॉ. बाबासाहेबांनी 13 ऑक्टोबर 1935 रोजी 'मी हिंदू धर्मात जन्माला जरी आलो तरी मी हिंदू धर्मात मरणार नाही' अशी घोषणा केली होती. दि.13 ऑक्टोबरला येथे भव्य कार्यक्रम होत असतात. उत्तर महाराष्ट्रातील हे पवित्र स्थळ मानले जाते.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो.9370773608

# नागवन रॉयल थाई महाविहार येथे भदंत बोधीरत्न नायक महाथेरो यांच्यावर अंत्यसंस्कार

**नागपूर :** आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ बौद्ध धर्मगुरू आणि धम्मप्रचारक भदंत बोधीरत्न नायक महाथेरो यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्यावर नागपूर येथील नागवन रॉयल थाई महाविहार येथे अत्यंत भावपूर्ण वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो भिक्खू, उपासक-उपासिका आणि धम्मअनुयायींनी महाथेरोंना अखेरचा निरोप दिला.



महाथेरोंच्या पार्थिवावर बौद्ध परंपरेनुसार त्रिशरण, पंचशील, परित्राण पठण आणि विविध धार्मिक विधी पार पाडण्यात आले. देशातील विविध भागांतून तसेच परदेशातून आलेल्या भिक्खू संघाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्याचा गौरव करत श्रद्धांजली अर्पण केली.

भदंत बोधीरत्न नायक महाथेरो यांनी अनेक दशकांपासून बुद्ध धम्माचा प्रसार, सामाजिक समता, करुणा आणि मानवतावादी मूल्यांच्या प्रचारासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक धम्मकार्ये आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात आले होते. अंत्यसंस्कारावेळी उपस्थित धम्मअनुयायींनी महाथेरोंच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या धम्मकार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. महाथेरोंच्या निधनाने भारतीय आणि जागतिक बौद्ध समाजाची मोठी हानी झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

भिक्खू संघाच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या अंत्यसंस्कार सोहळ्यात मोठ्या संख्येने श्रद्धाळू सहभागी झाले होते. संपूर्ण परिसरात गंभीर आणि शोकाकुल वातावरण होते. महाथेरोंच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

# वैद्यकीय तज्ज्ञांना बांधकामासाठी जबाबदार धरणे चुकीचे : डॉ. नितीन राऊत

**मुंबई :** विदर्भातील शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता असताना वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अनावश्यक प्रशासकीय जबाबदाऱ्या टाकणे योग्य नसल्याचा मुद्दा काँग्रेसचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी विधानसभेत उपस्थित केला.



सभागृहात बोलताना डॉ. राऊत म्हणाले की, रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांच्या इमारतींचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत (PWD) केले जाते. अधिष्ठाता हे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ असून अभियंते नाहीत. त्यामुळे बांधकामाशी संबंधित बाबींसाठी त्यांना जबाबदार धरणे अथवा त्यांच्यावर दबाव टाकणे योग्य नाही. अशा प्रकारामुळे तज्ज्ञ डॉक्टरांचे मनोधैर्य खच्ची होत असून त्यांच्या वैद्यकीय सेवांवरही परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले.

**मंत्र्यांचे स्पष्टीकरण :** यावर उत्तर देताना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या बांधकामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाचीच असते. संबंधित नेत्र विभागाच्या इमारतीच्या स्ट्रक्चर ऑडिटसाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला असून, अहवाल प्राप्त होताच नवीन इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात येईल.

## महत्वाचे

### धम्म संगोष्टीच्या 400 व्या सभेचे आज पर्व

**नागपूर :** भारतीय संविधान, लोकशाही आणि आंबेडकरी विचारांच्या प्रसारासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या 'चार सौ पार' धम्म संगोष्टी सभेच्या 400 व्या पर्वाचे आयोजन गुरुवार, दि. 25 जून 2026 रोजी सकाळी 9 वाजता मनीषनगर येथील नरेश धोपटे यांच्या निवासस्थानी केले आहे. या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक प्रा. संध्या राजुरकर राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून आंबेडकरी विचारवंत व सुप्रसिद्ध वक्ते प्रा. अशोक गोडघाटे हे 'भारतीय संविधान निर्मिती आणि अपेक्षित लोकशाही' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात धम्मगीतांनी होणार असून सुप्रसिद्ध गायिका सुनीता रामटेके धम्मगीते सादर करणार आहेत. कार्यक्रमानंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली असून त्यासाठी शारदा घोडके, प्रा. यशवंत दुपटे, नूतनदास टेंभुर्णे, नरेश धोपटे आणि एस.टी. चव्हाण यांनी प्रायोजकत्व स्वीकारले आहे. धम्म सभेच्या 400 व्या पर्वानिमित्त कृती समितीच्या वतीने समाजकार्य, धम्मकार्य आणि संघटनात्मक कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. यामध्ये नरेश धोपटे व उषा धोपटे, दादाराव बनसोड, श्याम जाधव, हिरालाल शेंडे, सिद्धार्थ सोमकुवर आणि उपेंद्र कांबळे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. रमेश पाटील (मिहान) आभार प्रदर्शन करणार आहेत.

धम्म सभा, संगोष्ठी आणि सामाजिक प्रबोधनाच्या या ऐतिहासिक 400 व्या पर्वाला सर्व धम्मबंधू-भगिनी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी सकाळी 9 वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त तुकूम येथे विविध कार्यक्रम



**चंद्रपूर :** सिद्धार्थ नगर, तुकूम येथील सिद्धार्थ बुद्ध विहार समिती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता सिद्धार्थ बुद्ध विहार, सिद्धार्थ नगर, तुकूम येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीमध्ये गुणवत्तापूर्ण यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी साहित्यिक, पत्रकार व कवी अविनाश टिपले लिखित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनातून भारत' या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी विचारवंत व साहित्यिक डॉ. प्रा. इसादास भडके राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून धम्म अभ्यासक व साहित्यिक प्रा. रवी कांबळे तसेच ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत खुशाल तेलंग उपस्थित राहतील. याशिवाय प्रमुख उपस्थितीत अविनाश टिपले आणि दिलीप वावरे उपस्थित राहणार आहेत. राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक न्याय, शिक्षण व समतावादी विचारांचा जागर करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सिद्धार्थ बुद्ध विहार समिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमच्या वतीने २७ जूनला परिसंवाद



**नागपूर :** आरक्षणाचे जनक आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमच्या वतीने शनिवार, २७ जून रोजी विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

'भारताच्या निर्मितीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान' हा परिसंवादाचा विषय असून सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर यामध्ये मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे माजी प्रधान सचिव किशोर गजभिये आणि सुप्रसिद्ध लेखक, संशोधक व समीक्षक डॉ. संजय शेंडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे अध्यक्ष मनोहर चंद्रीकापूरे राहतील. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राज गजभिये तसेच दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजुरकर उपस्थित राहणार आहेत. राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक न्याय, शिक्षण आणि आरक्षणविषयक कार्याचा वेध घेणाऱ्या या परिसंवादास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे महासचिव सच्चिदानंद दारूंडे यांनी केले आहे.

# राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी प्रवीण बागडे यांची निवड



**नागपूर :** पत्रकारिता, सामाजिक प्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार तसेच वंचित, शोषित आणि बहुजन समाजाच्या न्यायहक्कांसाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ज्येष्ठ पत्रकार, लेखक व सामाजिक विश्लेषक प्रवीण मोरेश्वर बागडे (नागपूर) यांची "राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार-२०२६" साठी निवड करण्यात आली आहे. आंबेडकरी विचारसरणीला वाहिलेल्या दैनिक निळे प्रतिकच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक, पत्रकारिता आणि समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

हा पुरस्कार शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता, मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर, टी.व्ही. सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. दैनिक निळे प्रतिकचे मुख्य संपादक तथा निळे प्रतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांनी ही निवड जाहीर केली. पत्रकारिता, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे संवर्धन आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याच्या कार्याची दखल घेऊन प्रवीण बागडे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रवीण बागडे यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक प्रश्नांवर निर्भीडपणे लेखन करत समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता तसेच आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांनी समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले आहे. राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल प्रवीण बागडे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# सुधीर भगत यांच्यात मला चार पैलू दिसले : डॉ. गंगाधर अहिरे



**नागपूर :** डॉ. सुधीर भगत कुटुंबाच्या सदस्यातील लोकांना आधार, उत्तम कवी गायक, सामाजिक कार्यकर्ते, तसेच हे कर्तव्यशील अधिकारी त्यांच्यातील हा गुण मला सातत्याने बघता आले. त्यांच्या निधनाने केवळ कुटुंबाची हानी झाली नसून ज्या ज्या क्षेत्रात त्यांनी काम केले त्या क्षेत्राची हानी निश्चित झाली ती कधीही भरून न निघणारी आहे असे विचार गंगाधरराव अहिरे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड. माणिकराव सावंग तर प्रमुख उपस्थिती म्हणून दादाकांत धनविजय, राजु फुले, प्रा. राहुल मून, सोनाली भगत, काभुराज बोढारे उपस्थित होते. अहीरे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त काही गाणी लिहून स्वरबद्ध सुरमणी प्रभाकर धाकडे यांच्याकडून महामानव या कॅसेट तयार, हजारो कॅसेट चळवळीच्या कार्यकर्तेपर्यंत पोहोचवली. एकही रुपया रॉयलटी घेतली नाही. म्हणूनच सुधीर भगत विविध पैलुचा माणूस आपल्या हवे होते.

दादाकांत धनविजय विचार व्यक्त करतांना म्हणाले की, अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडत असताना गेली दहा वर्षे पाली विषयाला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी जो संघर्ष केला ते विसरता येणार नाही.

आंबेडकरी चळवळीतील व प्रत्येक क्षेत्रातील कार्यकर्त्यांशी घट्ट नाते होते.

राजु फुले यांनी त्यांच्या प्रशासकीय सेवेतील अनेक आठवणी व्यक्त केले.

याप्रसंगी डॉ. मच्छिंद्र चोरमारे यांनी तथागत कविता संग्रहावर भाष्य केले. डॉ. त्र्यंबक दुनबळे, अशोक जांभुळकर यांनी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सावंत बोलले की त्यांच्या जन्मदिनानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पाली विषयावर गोल्ड मेडल देण्याची सुरुवात करुन न्यायालयात ऑफिस च्या कामानिमित्त देवाची शपथ नाकारून संविधानची शपथ घेणारे पहिले व्यक्तीमत्व होते.

प्रास्ताविक छाया खोब्रागडे तर संचालन राजन वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सुधीर भगत यांचे चाहते उपस्थित होते.

# माता रमाई आंबेडकर व कवी वामनदादा कर्डक यांना ३० जूनला काव्यात्मक अभिवादन

**नागपूर :** माता रमाई आंबेडकर आणि महान लोकशाहीर, कवी वामनदादा कर्डक यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दि. ३० जून २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता उर्वेला कॉलनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉन्फरन्स हॉल येथे विशेष काव्यात्मक अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.





हा कार्यक्रम संथागार फाउंडेशन, १९४२ महिला क्रांती परिषद समिती, सम्यक म्युझिकल ग्रुप मनीषनगर नागपूर आणि विविध महिला संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात प्रा. संध्या राजुरकर (निवासी संपादक, बहुजन सौरभ), प्रा. डॉ. सरोज आगलावे (अध्यक्ष, धम्मदिना वाचनालय), तसेच पुष्पा बौद्ध (अध्यक्ष, राष्ट्रीय पारिवारिक धम्म संगोष्टी) या विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम.एस. शाक्य जांभुळे, संस्थापक, संथागार फाउंडेशन, करणार असून नरेश धोपटे (डायरेक्टर, सम्यक म्युझिकल ग्रुप) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. यावेळी डॉ. एम.एस. शाक्य जांभुळे लिखित "रमाई तू महान" या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच डॉ. जांभुळे लिखित व डॉ. वीणा राऊत दिग्दर्शित "सम्राट अशोक" या लघुनाट्याचे सादरीकरण होणार आहे.

कार्यक्रमात माता रमाई आंबेडकर आणि वामनदादा कर्डक यांच्या जीवनकार्यावर आधारित गीत, कविता आणि सांस्कृतिक सादरीकरणे होणार आहेत. यामध्ये भगवतकर साहेब, निळकंठ राऊत, मनीषा मुंघाटे, जया कलीहारी, संध्या वारके, नंदा पंचभाई, मंगला जांभुळे, शिल्पा मॅकेश्वर, हरीश राऊत, नीलेश पाटील, रूपाली जाधव, स्नेहल मेश्राम, डॉ. एम.एस. शाक्य जांभुळे, संध्या घोडके आणि रत्ना मुन हे गायक-गायिका सहभागी होणार आहेत.

तसेच पुष्पा सोमकुवर, पद्मा बहादूरे, ज्योत्स्ना बनसोड, प्रीती तिरपुडे, प्रा. प्रवीण कांबळे, विलास गजभिये, प्रा. भीमराव गायकवाड, सूर्यकांत मुंघाटे, प्रतिभा सहारे, डॉ. सुनंदा जुलमे आणि दादा पाटील हे कवी आपल्या काव्यरचनांद्वारे अभिवादन अर्पण करणार आहेत.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय पारिवारिक धम्म संगोष्टी, पौर्णिमा महिला मंडळ (बेसा), धम्म देशना संघ (पिपळाफाटा), रमाई महिला मंडळ (टेक ऑफ सिटी) आणि रमाई प्रगतीशील महिला बचत गट, नागपूर यांचे सहकार्य लाभले आहे.

आयोजकांनी नागपूरकर साहित्य, संगीत व सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे.

# जगातील सर्वात लहान रोबोट आर्म तयार करून हितेन धारपुरे यांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा विश्वविक्रम

**नागपूर :** महाराष्ट्रातील स्कूल ऑफ स्कॉलर्स, अत्रे लेआउट येथील १७ वर्षीय विद्यार्थी हितेन धारपुरे याने जगातील सर्वात लहान रोबोटिक आर्म तयार करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आपले नाव नोंदविले आहे. त्याच्या या अभिनव संशोधनामुळे नागपूरसह महाराष्ट्राची मान जागतिक स्तरावर उंचावली आहे. यापूर्वीही जगातील सर्वात लहान रोबोटिक आर्मचा विक्रम अमेरिकेतील इंडियाना येथील केल्टन सेरा यांच्या नावावर होता. त्यांनी तयार केलेल्या ४४.४९ मिमी (१.७५ इंच) आकाराच्या 3D-प्रिंटेड रोबोटिक आर्मने हा विक्रम प्रस्थापित केला होता. हितेनने तयार केलेल्या रोबोटिक आर्मचे प्रमाणित मोजमाप केवळ ३९.२५० मिमी असून त्याने हा जागतिक विक्रम मोठ्या फरकाने मोडीत काढला आहे. हितेनने विकसित केलेले हे उपकरण पूर्णपणे कार्यरत इलेक्ट्रोमेकॅनिकल रोबोटिक आर्म असून ते मानवी हाताप्रमाणे विविध गुंतागुंतीच्या हालचाली करू शकते. या आर्ममध्ये मायक्रो सर्वो मोटर्स आणि अचूक PWM कंट्रोल मॉड्यूलचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे ते तीन स्वतंत्र अक्षांवर हालचाल करू शकते तसेच लहान वस्तू अचूकपणे पकडण्याची क्षमता त्यामध्ये आहे. या प्रकल्पासाठी हितेनने FDM तंत्रज्ञानाचा वापर करून कस्टम चेसिस डिझाइन केले आणि 3D प्रिंटिंगद्वारे त्याची निर्मिती केली. अतिशय मर्यादित जागेत सर्वो मोटर्स व वायरिंग अचूकपणे बसविण्याचे आवाहन त्याने यशस्वीपणे पेलले.



आपल्या यशाबद्दल बोलतांना हितेन धारपुरे म्हणाला, "मायक्रो-मॅन्युफॅक्चरिंगच्या भौतिक मर्यादा ओलांडून सहज उपलब्ध तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च-अचूकतेचे रोबोटिक्स विकसित करता येते, हे सिद्ध करणे हे माझे ध्येय होते. हा जागतिक विक्रम 'विकसित भारत' संकल्पनेतील माझे योगदान असून जागतिक दर्जाच्या नवकल्पना आपल्या घरातूनही साकार होऊ शकतात, हे यातून अधोरेखित होते." संपूर्ण मॉडेल प्रगत CAD सॉफ्टवेअरच्या सहाय्याने सुरुवातीपासून तयार करण्यात आले. जागेचा प्रत्येक मिलिमीटर प्रभावीपणे वापरत सूक्ष्म आकारात उच्च-अचूकतेचे रोबोटिक्स साध्य करण्याची क्षमता या प्रकल्पातून दिसून येते. तसेच सहज उपलब्ध तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगत STEM अनुप्रयोग विकसित करण्याचा हा एक उत्कृष्ट नमुना ठरला आहे. हितेन धारपुरे यांच्या या ऐतिहासिक कामगिरीचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात नव्या पिढीसाठी तो प्रेरणास्थान ठरत आहे.

# नशा मुक्त भारत अभियानांतर्गत उमरगाव येथे चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**उमरगाव (ता. उमरेड) :** केंद्र शासनाच्या 'नशा मुक्त भारत अभियान 2026' अंतर्गत 'नशामुक्त समाज – सुदृढ भारत' या विषयावरील चित्रकला स्पर्धा नालंदा बुद्ध विहार, उमरगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमास आशिर्वाद फाऊंडेशन, नशाबंदी कृती समिती नागपूर, क्रिश्चन मायनॉरिटी फोरम नागपूर, ओशो ऑर्गनायझेशन इंडिया आणि आशिर्वाद बाल विकास मंच यांचे सहकार्य लाभले.



स्पर्धेत सक्षम कुणाल गायगवळी, देवांशा प्रमोद बनकर, वेदांत मनोहर शेवारे, श्रेया बबन वाघमारे, मंथन प्रमोद बनकर, प्रणय मनोहर शेवारे, इशिका बंडू नितनवरे, इधिका बंडू नितनवरे, राणी बबन वाघमारे, मितांशा मनोज शेवारे, पार्वताबाई तुकाराम नितनवरे, पूजा प्रमोद बनकर, सरपंच हिराबाई हरिदास शेवारे, आंचल पीयूष जारुंडे, हरिदास शेवारे, प्रतीक हरिदास शेवारे तसेच सुनामी गायगवळी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धकांनी आपल्या चित्रांमधून व्यसनांचे दुष्परिणाम, निरोगी जीवनशैलीचे महत्त्व आणि नशामुक्त समाजाची आवश्यकता प्रभावीपणे मांडली. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये, युवकांमध्ये आणि नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नशामुक्त भारत घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. 'नशेला नकार द्या' आरोग्यदायी व उज्ज्वल भविष्य घडवा' हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या विलास शेवाळे आणि सर्व सहकारी संस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# अजय बिवडे यांना 'अजेय लेखणी सन्मान पुरस्कार-२०२६' जाहीर



**नागपूर :** पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत सिंहवाणी वृत्त या नागपुरातून प्रकाशित होणाऱ्या दैनिकाचे मुख्य संपादक अजय बिवडे यांची प्रतिष्ठेच्या 'अजेय लेखणी सन्मान पुरस्कार-२०२६'साठी निवड करण्यात आली आहे. गेल्या १७ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या अजय बिवडे यांनी विविध वृत्तपत्रांमधून समाजाभिमुख पत्रकारिता करत आपला वेगळा ठसा उमटविला आहे. ते भारत सरकारमान्य पीआरजीआय प्रेस असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत असून, दैनिक शिवघोषचे संपादक म्हणूनही कार्यरत आहेत. आर्यारवी एन्टरटेन्मेंट, मुंबईतर्फे दरवर्षी महाराष्ट्रातील पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, साहित्यिक, कलावंत आणि समाजसेवक यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात येतो. त्याच परंपरेनुसार यंदाही विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दि. १२ जुलै रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सुरेंद्र गावसकर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात अजय बिवडे यांना 'अजेय लेखणी सन्मान पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल आर्यारवी एन्टरटेन्मेंटचे आयोजक महेश्वर तेटांबे तसेच समन्वयक गुरूनाथ तिरपणकर यांनी अजय बिवडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा हा सन्मान असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त करण्यात येत

# पारस एफजीडी प्रकल्पातील आमरण उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली




**बाळापूर :** पारस एफजीडी प्रकल्पातील कामगारांच्या न्याय मागण्यांसाठी सुरू असलेल्या बेमुदत आमरण उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी उपोषणकर्त्यांची तब्येत खालावल्याची माहिती महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष भाई जी.एम. भालेराव यांनी दिली. उपोषणकर्ते प्रमोद बाळू वानखडे, दिलीप लक्ष्मण वानखडे, विशाल हरिदास वाहुरवाघ व दिनेश सहदेव उगले यांची प्रकृती चिंताजनक होत असून, त्यांच्या जीवितास काही हानी झाल्यास प्रकल्प व्यवस्थापन व संबंधित कंत्राटदार जबाबदार राहतील, असा इशाराही त्यांनी दिला. महानिर्मिती पारस एफजीडी प्रकल्पातील मुख्य कंत्राटदार बी. ॲन्ड आर कंपनी, अभि इंजिनिअरिंग कंपनी आणि केपीके कन्स्ट्रक्शन अंतर्गत कार्यरत सुमारे ५० ते ६० कामगारांच्या प्रलंबित वेतन, फुल अँड फायनल सेटलमेंट, किमान वेतन, वेतनफरक, बोनस, घरभाडे, वार्षिक रजा वेतन व नोटीस पे यांसह विविध न्याय मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे. दरम्यान, उपोषणकर्त्यांची व्यवस्थापनाने साधी विचारपूसही न केल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. २३ जूनच्या रात्री झालेल्या वादळी पावसामुळे उपोषण मंडपात सापांचा वावर वाढल्याने उपोषणकर्त्यांना अतिरिक्त संकटाचा सामना करावा लागला. जी.एम. भालेराव यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाला कामगारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648